परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२८ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०२१
Website : www.marathepratishthan.org
(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

सन २०२१ सरत्या वर्षातील ‘हितगुज’चा हा शेवटचा अंक वर्षातून चार अंक आपण काढतो. ‘हितगुज’ हे त्रैमासिक आहे आणि आज छापील न येता डिजिटल अंक येतो. मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबर असे चार अंक निघतात. दि. १५ ऑगस्टला पंतप्रधान मोदींनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात दि. १४ ऑगस्ट हा फाळणी स्मृतिदिन म्हणून मानावा असे आवाहन केले. स्वातंत्र्य सहज प्राप्त झालेले नाही. क्रांतिकारकांचे बलिदान, प्राणांच्या आहुती देऊन ते मिळविले आहे, याची जाणीव आज स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या प्रत्येक पिढीस होत राहावी. फाळणीला जबाबदार कोण? सत्तेच्या हव्यासापायी जनतेच्या मनात भ्रम निर्माण करून खोटा प्रचार होत राहिला. सत्य इतिहास नव्या पिढीला समजावा म्हणून दि. १४ ऑगस्ट फाळणी स्मृतिदिन म्हणून पाळणे प्रत्येक देशभक्त, सुजाण नागरिकाचे आद्य कर्तव्य ठरते. असो.

मार्च २०२१च्या सुमारास कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने रौद्र रूप धारण केले आणि हाहाकार उडवला. अशा वेळी कोरोना होणे म्हणजे केवळ मरणे ही अवस्था निर्माण झाली. ऑक्सिजनचा तुटवडा, सरकारी-खाजगी रुग्णालये उपचारासाठी कमी पडू लागली होती. कोरोना झाल्यावर वेळेत औषधोपचार मिळाले नाहीत तर आपण मरणार या धास्तीनेच लोकांचे बळी जात होते. अशा कठीण परिस्थितीत या आजाराबाबतचे गैरसमज दूर करून त्यांना उपचार आणि मानसिक आधार खंबीरपणे देण्याची अत्यंत आवश्यकता होती. अशा काळात सामाजिक संस्था, व्यक्ती, डॉक्टर, परिचारिका, पोलीस यांनी जे अहोरात्र कोरोना पीडितांची सेवा करण्याचे मानवतेचे कार्य केले त्याला तोड नाही. ते सर्व ‘कोरोना योद्धा’ म्हणून त्यांचा सन्मान केला, त्यांना अभिवादन. आपल्या मराठे परिवारातही असे ‘कोरोना योद्धे’ असणार त्यांनी मराठे प्रतिष्ठान, हितगुजशी संपर्क साधावा. आम्हालाही त्यांचा गौरव करण्याचा सुयोग येईल आणि त्यांच्याविषयी अभिमान वाटेल.

कोरोना लढाई यशस्वी झाल्यानंतर शासनाने ‘लॉकडाऊन’ निर्बंध शिथिल केले. कोरोना लशीच्या दोन मात्रांचा डोस देऊन लसीकरण मोहीम कोटींच्या घरात नेऊन भारत अग्रेसर राहिला. शाळा, महाविद्यालये, कार्यालये सुरू झाली. सिनेसृष्टी-नाटकाचा पडदा उघडला. नाशिकला साहित्य संमेलन पार पडणार आहे. दिवाळी सणही उत्साहाने साजरा करता आला. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आत्मनिर्भर भारत साजरा करतो आहे.

### अनोखा – अनुकरणीय उपक्रम

आपले ‘मराठे प्रतिष्ठान’चे उत्साही अध्यक्ष श्री. विजय मराठे यांनी एक वेगळाच अभिनव उपक्रम हाती घेऊन पार पाडला. अगदी दिवाळीच्या तोंडावर त्यांच्या मनात आलं की आपल्या मराठे कुळातील ज्या व्यक्ती निधन पावून आज आपल्याबरोबर नाहीत त्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन, फराळ करून दिवाळी त्यांच्यासमवेत काही क्षण आनंदात घालवावे.

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई – ४०००३१

मग काय मनात आल्यावर सौ. मानसी गाडगीळ आणि सौरभ यांनी ही कल्पना लगेच उचलून धरली. बर्फी आणि चिवडा पाकीट देऊन दुःखी कुटुंबांची दिवाळी सुखाची केली. पुणे शाखेचे अध्यक्ष श्री. अरुणराव मराठे यांच्या सौभाग्यवती कै. अंजली मराठे, कुलवृत्तांतकार कै. सदाशिव जोशी आणि कै. सौ. जोशी, प्लास्टिक खाणारी कीड त्याचे संशोधन करणारे श्री. राहुल मराठे यांच्या मातोश्री आज आपल्यात नाहीयेत. चंद्रशेखर विद्वांसच्या मातोश्रींचेही निधन झाले आहे. त्याचप्रमाणे बडोद्याचे मराठे प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. मोहनराव मराठे यांच्या सौभाग्यवती सुषमाताईही आपल्यात नाहीयेत. त्यांची कन्या शिल्पा जोशी पुण्यात राहते.

या सर्वांच्या घरी प्रत्यक्ष जातीने जाऊन त्यांची सांत्वना केली. प्रत्यक्ष भेट घेऊन फराळ दिला. त्यांच्यासमवेत दिवाळी साजरी करून, या कुटुंबीयांच्या घरात आणि मनात आनंदाची कारंजी फुलविली. खरोखर हे सगळे अनोखे आणि अनुकरणीय आहे. असो.

आपण सर्वजण येणाऱ्या २०२२ सालचे स्वागत करायला आतुर झाले आहोत. तेव्हा तुम्हा सर्वांना 'नवीन हे वर्ष सुखाचे जावो' अशा शुभेच्छा देऊन लेखणीला विराम देते.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. १८ नोव्हेंबर, २०२१)
भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

---




**पहिला क्रमांक**
**छायाचित्र : भानुदास मराठे, बडोदा**




**पहिला क्रमांक**
**ओंकार मराठे, बडोदा**



**दुसरा क्रमांक**
**गिरीजा मनोहर**



**तिसरा क्रमांक**
**पुरुषोत्तम मराठे, कल्याण**

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी 'मराठे प्रतिष्ठान'तर्फे घरगुती गणपती उत्सव सजावट स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी १३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे.

**पहिले तीन बक्षिसांचे मानकरी.**

१) भानुदास मराठे, बडोदा. गुण १८४
१) ओंकार मराठे, बडोदा. गुण १८४.
२) गिरीजा सिद्धार्थ मनोहर, ब्रुकफिल्ड अमेरिका, गुण १७४
३) पुरुषोत्तम मराठे, कल्याण. गुण १७१.

# संवाद कुलबांधवांशी

◆श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**नमस्कार कुलबांधव आणि भगिनींनो**

'हितगुज'चा डिसेंबर २०२१ ह्या अंकातून आपल्या भेटीला येताना खूप आनंद होत आहे. या वर्षीची ही शेवटची भेट. बघता बघता दिवस, महिने आणि वर्षे निघून जातात.

आपण पहातच असाल कि गेल्या वर्षभरात 'हितगुज'मध्ये नवनवीन कुलबांधव व भगिनी लिहू लागले आहेत. मी मुद्दामच माझ्या माहीतीतील वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांना लिखाण पाठवण्यासाठी उद्युक्त करीत आहे व त्यामुळे आपणा समोर विविध विषयांवरील लिखाण येत आहे. आम्ही वारंवार आपणास आवाहन करत असतो की, 'आपणही लिहीते व्हा.' हळूहळू आपल्या अंकामध्ये खूपच वैविध्य दिसून येईल.

या अंकात श्री. परीमल मराठे यांचा एक वेगळा लेख आहे. तसेच आपल्या पुणे शाखेने यावर्षी दिवाळी अगोदर एक वेगळा उपक्रम राबवला. मागील वर्षभरात ज्या कुलबांधव तसेच भगिनींचे निधन झाले अशा कुटुंबातील सदस्यांना भेटून दिवाळीचा फराळ दिवाळीच्या अगोदर देण्यात आला. आमच्या समोर पुणे शाखेने हा विषय मांडला व तो आम्हाला खूपच भावला. यापासून प्रेरित होऊन इतर गावांमधे आणि शहरांमध्ये देखील तेथील स्थानिक कुलबांधवांनी हा उपक्रम पुढील वर्षापासून करायला हरकत नाही. आपले कुलबांधव एकत्र येणे हाच मुख्य उद्देश ठेवून विविध विभागांमध्ये लोकांनी स्वतःहून विविध उपक्रम राबवणे आवश्यक आहे. आपण कोणताही उपक्रम राबवला की आम्हाला कळवायला विसरू नका.

प्रतिष्ठानचे भूतपूर्व कार्यवाह तसेच भूतपूर्व विश्वस्त श्री. मोहन मराठे यांना डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनतर्फे 'बेस्ट रिसर्च पेपर'साठी सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले. याचा सविस्तर वृत्तांत अंकात दिला आहे.

आपले मराठ्यांचे जावई श्री. गिरीश जाखोटिया ह्यांचे उत्तमोत्तम लिखाण प्रत्येक अंकात असतेच, तसेच याहीवेळी एका वेगळ्या विषयावर त्यांनी लेखन केले आहे ते जरुर वाचा. कथा लेखिका राधा मराठे यांच्या कथा नेहमीच अंकात समाविष्ट असतात यावेळी ललित लेखन हा विषय त्यांनी उत्तमपणे मांडला आहे. ह्याच सोबत पुणे येथील कुलबांधव श्री. सुधाकर मराठे यांची कविता समाविष्ट केली आहे. कोल्हापूर येथील कुलबांधव श्री. नंदकुमार मराठे यांचेही विविध विषयांवरील मार्गदर्शक लिखाण या अंकात समाविष्ट करण्यात आले आहे. असेच विविध विषयांवरील लिखाण जर आपणही करत असाल तर आमच्याकडे जरूर पाठवा, योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल.

आपणास कळविण्यास अतिशय आनंद होत आहे की प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी आपण घरगुती गणेश उत्सव सजावट स्पर्धा आयोजित केली होती आणि त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला. एकुण १३ जणांनी स्पर्धेत सहभाग घेतला व त्यापैकी ३ वगळता बाकी सर्व स्पर्धक इतर राज्यातील होते. १ स्पर्धक अमेरिकेतील होत्या. स्पर्धा चुरशीची झाली आणि प्रथम क्रमांक दोघांचा आला. पुढील वर्षी आणखीन प्रतिसाद अपेक्षित आहे.

मंडळी आपले अखिल भारतीय संमेलन बडोदा येथे झाल्यानंतर कोठेही झाले नाही. गेले दीड वर्षे पेक्षा जास्त काळ तर महामारीमध्ये गेला. आता हळूहळू सर्व सुरळीत होत असून आपण आता संमेलनासाठी तयारी सुरू करू शकतो. तेव्हा आपणास आवाहन करीत आहोत की आपल्या विभागातील कुलबांधवांनी एकत्र येऊन यावर विचार करावा. अपेक्षित ठिकाणे मी आपणांस सांगतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आपणाला एक अखिल भारतीय संमेलन होणे अपेक्षित आहे. तसेच नागपूर विभागामध्ये देखील एक संमेलन होणे अपेक्षित आहे. तरी त्या त्या विभागातील कुलबांधवांना आवाहन करीत आहोत की आपण पुढाकार घेऊन आपापल्या विभागामध्ये संमेलन घेण्यासाठी पुढाकार घ्यावा.

चला तर, आता या अंकाबरोबर सन २०२१ची समाप्ती होणार आहे व २०२२ ची सुरुवात होणार आहे. नवीन वर्षाच्या आपणा सर्वांना भरभरून शुभेच्छा. आता भेट पुढील वर्षी.

◆

**मराठे परिवारातील प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील जन्म, मृत्यु, उपनयन, शैक्षणिक प्रगती व विवाह, इत्यादी घटना वेळेत आम्हाला कळवा म्हणजे नोंद घेतली जाईल. तसेच आपण जर आपले घर बदलले तर नवीन पत्यासह तपशील लगेच कळवावे.**

# महाकाव्याचे धीरोदात्त नायक

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ०२२ २४१५०८८९

**स्वा**तंत्र्यवीर सावरकर म्हणजे असामान्य ध्येयवेडा, प्रखर राष्ट्रभक्त.

'हे मातृभूमी, तुजला मन वाहियेले।
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले।
तू तेचि अर्पिली नवी कविता रसाला।
लेखाप्रती विषय तूचि अनन्य झाला।।'

सावरकरांनी आपले मन, वक्तृत्व, वाग्वैभव, नवी रसाळ कविता मातृभूमी चरणी अर्पिली. त्यांच्या लेखांचा विषयही मातृभूमी हाच होता. ईश्वराला भक्त जसे सर्वस्व अर्पण करतो. त्याप्रमाणे त्यांनी काया, वाचा, मने सारे काही मातृभूमीला वाहिले. स्वातंत्र्यवीर सावरकर स्वातंत्र्यलक्ष्मी, भारतमाता या स्वातंत्र्यदेवीचे पुजारी आहेत. त्यांची 'जयोस्तुते श्री महन्मंगले' ही अजरामर कविता आहे. मोक्ष, मुक्ती, परब्रह्म हे सारे मातृभूमीच्या स्वातंत्र्यात त्यांनी पाहिले. ''तू सूर्याचे तेज उद्धीचे गांभीर्यही तूंचि'' अशी स्वतंत्रतादेवीची पूजा बांधली. या पूजेप्रित्यर्थ सर्वस्वाच्या समिधा अर्पून टाकण्यात धन्यता मानली. महाकवी सावरकरांना जन्मतःच सूर्याचे आणि सागराचे अनिवार आकर्षण होते. त्यांच्या काव्यातून दिव्यत्वाची प्रचिती येते. उदा. 'जगन्नाथाचा रथोत्सव' कविता. स्वातंत्र्यवीर सावरकर १९११ ते १९२३ या कालखंडात अंदमानात दोन जन्मठेपींची शिक्षा भोगत होते. अंदमानात एकीकडे काथ्या कुटणे, तेलाचा घाणा ओढणे यासारखी कष्टप्रद कामे करीत असताना त्यांच्या साहित्यिक, कवी आणि स्वातंत्र्यप्रेमी विचारांना खंड पडला नव्हता. कागद उपलब्ध नसल्याने ते कोठडीच्या भिंतीवर टोकदार खड्याने किंवा कधी काट्याने किंवा खिळ्याने ओळी लिहीत असत. नंतर त्या पाठ करत.

काव्याच्या मानस सरोवरात लीलया विहार करणारा हा राजहंस होता. पण भोवतालच्या कावळ्यांना तो कळला नाही. त्यांची प्रतिमा उत्तुंग भरारी घेत अनंत आकाशात गेली आणि तिला जगन्नियंत्या जगन्नाथाचे अपरोक्ष दर्शन झाले. विश्वनियंत्या परमेश्वराची रथयात्रा पाहण्यास मिळाली.

'ऐश्वर्ये भारी! या अशा ऐश्वर्ये भारी।
महाराज आपुली कथा ना कुठे निघे स्वारी।
दिक् क्षितिजांचा देदिप्यरथ तुझा सुटता।
या कालपथाच्या अतूट उतरणीवरता।
नक्षत्रकणांचा उडे धुराळा परता।



युगक्रोश दुरी। मागुती युगक्रोश दुरी।
महाराज आपुली कथा ना कुठे निघे स्वारी।।'

जगन्नाथाचा रथ दिक्क्षितिजाचा आहे. तो कालपथाच्या अतूट उतरणीवरून जात आहे. त्याच्या चाकामागे नक्षत्रकणांचा धुराळा उडतो आहे. युगांचे कोस मागे पडत आहेत. अशा या रथयात्रेचे वर्णन जगातील कोणत्याच भाषेत नाही. भागवताचार्य वा. ना. उत्पात म्हणतात, सावरकरांच्या साहित्याला असलेला हा परतत्त्व स्पर्श ज्ञानदेवाशिवाय वा व्यास वाल्मिकी शिवाय अन्य कोणाच्या साहित्याला नाही. सावरकर साहित्य म्हणजे पुरुषसूक्त आहे. कालिदासाशी स्पर्धा करणारे उपमा कौशल्य आणि मोगलांचे सिंहासन फोडणाऱ्या मराठी भाल्याचे लखलखीत तेज आणि संत कवीचे भावमाधुर्य हे सारे गुण सावरकरांच्या कवितेत एकवटले आहेत. सावरकरांचे 'कमला' काव्य मराठी शारदेच्या उद्यानातील पारिजात आहे. त्यांचे पोवाडे म्हणजे मराठी साहित्यातील ज्वालारस आहे. तर 'सागरास' ही कविता म्हणजे मराठी साहित्याचे कैलास लेणे आहे.

### अलौकिक अद्‌भुत जीवन

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जीवन जसे अद्‌भुत तसेच त्यांचे साहित्यही अद्‌भुत! त्यांनी 'सागरास' ही अजरामर कविता डिसेंबर १९०९ मध्ये लिहिली. 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संघटनेने, ब्रिटिश शासनाला प्रत्यक्ष लंडनमध्येही प्रचंड हादरे

दिले. ब्रिटिश पोलिसांचा ससेमिरा टाळण्यासाठी आणि अतिशय दगदगीने ढासळलेल्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून तरुण सावरकर लंडनमधील ब्रायटन येथे विश्रांतीस गेले होते. एका संध्याकाळी निरंजन पाल या बंगाली भाषिक सहकाऱ्याबरोबर ते समुद्रकिनाऱ्याजवळ बसले होते. सूर्यास्ताच्या वेळी त्यांच्या मनात विलक्षण आर्त विचार आले. त्यांना लवकरच अटक होऊन फाशीची किंवा जन्मठेपेची शिक्षा होणार असल्याचे स्पष्ट दिसत होते. आपण आपल्या मातृभूमीला कधीही परतू शकणार नाही, या विचाराने त्यांची व्याकूळता वाढली. त्यातून 'ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' ही कविता स्फुरली. सावरकरांनी डोळ्यांतून अश्रू घळघळ वाहताना ती उच्चारली. निरंजन पाल यांना मराठी येत नव्हते, पण त्यांनी सावरकरांची व्याकूळ अवस्था नोंदली आहे. 'केसरी'त १९३८ मध्ये ही कविता प्रथम प्रकाशित झाली.

सागराची हृदयद्रावक आळवणी केल्यावर त्या कवितेच्या अखेरच्या ओळीत सावरकरांचा तेजस्वी लढाऊ बाणा प्रकट झाला. त्यांनी सागरास धमकाविले.

'तरी आंगलभूमी – भयभीता रे।
अबला न माझीही माता रे।
कथिल हे अगस्ति आता रे।
जो आचमनी एक पळी तुज प्याला। सागरा...'

हे सागरा माझी विनवणी ऐकली नाहीस तर माझी भारतमाता तुझे गाऱ्हाणे अगस्ति ऋषीस करेल, की ज्या अगस्तिपमुनीने सागरास एका आचमनात गिळून टाकले होते. असा धैर्यशील, लढाऊ बाणा स्वातंत्र्यवीर कवी सावरकरांचा प्रकट होतो.

आपल्या काव्यपरंपरेत भावार्थ ही संकल्पना शतकानुशतके जोडली गेली आहे. भावार्थ जाणल्यावरच काव्याच्या सखोल आशयविश्वात प्रवेश मिळू शकतो. म्हणून 'सागरास' कवितेमागची पार्श्वभूमी विशद केली.

**ज्वलंत दैवी प्रतिभा**

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनातील सर्वच घडामोडी आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे बहुतांश पैलू त्यांच्या ज्वलंत प्रतिभेचे दर्शन काव्यातून होते. सावरकरांच्या कवितेने 'बीभत्स' हा एक रस सोडला तर सर्व अन्य रसांतून, नाना छंदांतून, विविध वृत्तांतून लीलया आणि मुक्त संचार केला आहे. 'कमला' काव्यात कालिदासाला लाजवेल असा हळुवार शृंगार आहे. पोवाड्यातून आणि गीतातून वीररस ओसंडत आहे. विरहोच्छवास, माझे मृत्युपत्र, हाय भगतसिंग, सागरास इत्यादी कवितेत करुण रस आहे. 'सप्तर्षी'मध्ये अद्‌भुतरस आहे तर 'अनंताची आरती' 'जगाची जननी ही पिंडीका' इत्यादी कवितांतून शांत रस वाहत आहे. विश्वाच्या इतिहासाची पहिली पाने सापडणे अशक्य आहे, हा इतिहासाला मिळालेला शाप आहे.

'इतिहासाचे पहिले पान न मिळणे, कधी पाहायाते!
आरंभ तुझा दुसऱ्या पानापासुनि शाप हा याते।।

'सप्तर्षी' कवितेत भव्योदात्त स्वरूपात सहजस्फूर्तीने सुचलेली ही कल्पना महाकवी सावरकरच करू शकतात.' 'हे सदया गणया तार' मुलुखावेगळे गणेशस्तवन आहे. 'निरंजनासी–निरांजनांचा, देवा दीप तुला' सावरकरांनी रचलेली आरती त्यांनाच ओवाळण्यासाठी स्तुती सुमने अर्पण करते. 'रानात चुकलेले कोकरू', 'नाशकाजवळची लेणी', 'निजजाति छळाने हृदय का न तळमळते', 'अनादि मी अनंत मी', 'विश्वात आजवरी शाश्वत काय झाले?', 'हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा' या कविता म्हणजे मराठी साहित्यातील अक्षरलेणे आहेत. 'हिंद सुंदरा ती, वसुंधा ती' आकर्षक सौंदर्य या कवितेत आहे. रत्नागिरीत स्थानबद्ध असताना लिहिलेले 'तुम्ही आम्ही सकळ हिंदू–बंधू–बंधू' हे हिंदू एकता गीत खऱ्या अर्थाने 'हिंदुधर्म गीत' आहे. 'मला देवाचे दर्शन घेऊ द्या, डोळे भरून...' या कवितेतून प्रतीत होणारे धीरोदात्त सावरकर, समाजासाठी किती झटले हे अनुभवून या थोर आत्म्याच्या वाट्याला ब्राह्मणवादी हे विशेषण चिकटवणारा आमच्या करंट्या नेत्यांचं राजकारण आठवलं की त्यांची कीव करावीशी वाटते. 'बेडी' कविताही चिरस्मरणीय आहे. वैनायक हे वृत्त सुरू करून त्यांनी काव्यरचनेच महत्त्वाचे योगदान केले. सावरकरांच्या कवितांचा गाभा देशभक्ती हाच होता आणि हेतू देशविमोचनाचा होता.

'साप विषारी देशभूमीचा येई घ्याया चावा।
अवचित गाठुनि ठकवुनि भुलवुनि कसाही ठेचावा।।'

हा संदेश त्यांची कविता देते. उत्तुंग कल्पना विलास, ऊर्जस्वल काव्यप्रतिभा ही दैवी, ईश्वरी देणगी त्यांना लाभली होती. महाकाव्याची सर्व लक्षणे, वैशिष्ट्ये त्यांच्या कवितेत आहेत म्हणून ते महाकवी सावरकर आहेत.

'रवींद्रनाथांचे अभिनंदन' या कवितेत ते म्हणतात, ''भारतमाता आपली राजधानी परत मिळण्यासाठी समरबाह्य रथातून निघाली होती. मी कवीच्या कक्षात गेलो पण भारतमाता म्हणाली, ''मुला, या कक्षात फार गर्दी आहे. त्या प्रेरक यंत्रकक्षात राबणाऱ्या आणि स्वतः कोळसे होऊन गती देणाऱ्या सैनिकांची गरज आहे तेथे तू जा.'' म्हणून सावरकर कवींचा कक्ष सोडून बाल्ययंत्र कक्षात जळण्यासाठी गेले. देशभक्ती आणि स्वातंत्र्य हेच त्यांचे प्राण होते. दिव्य–दाहक व्रत, सतीचे वाण त्यांनी बुद्ध्याची स्वीकारले होते. मातृभूमीसाठी सर्वस्वाचा होम करणारा देशभक्त, क्रांतिकारक 'कमलफूल ते अमर झाले। मोक्षदायी पावन' अमर झाला आहे.

**उत्कट - भावस्पर्शी कविता**

सावरकरांची कविता दिव्य प्रतिभेने फुललेली आहे. हृदयपटलावर मूर्त रूप कविता होते ते सामर्थ्य सावरकरांच्या अलौकिक दिव्य प्रतिभेचे आहे.

सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर हा चार वर्षांचा होऊन लहानपणीच वारला. ती दुःखद वार्ता युरोपमध्ये त्यांना कळली तेव्हा प्रभाकराच्या स्मृतीने ते व्याकूळ, दुःखी झाले आणि त्यांनी 'प्रभाकरास' ही कविता लिहिली. बापाचे आर्त हृदय शोकाकुल झालेले या कवितेत दिसते. प्रभाकराच्या बाललीला पाहायच्या. त्याचे कोडकौतुक करायचे, सुखोत्सव पाहायचा परंतु त्याचवेळी मातृभूमी स्वतंत्र करण्याच्या ध्येयासाठी त्यांना विदेशगमन करावे लागले. प्रेमळ पित्याने हृदयावर धोंडा ठेवला आणि देशसेवेचे व्रत पाळण्यासाठी पुत्रप्रेमाचा, पत्नीचा त्याग करून त्यांना कठोरपणे जावे लागले. प्रभाकराचा असा अकाली वियोग त्यांच्या कोमल अंतःकरणाला भिडला.

'प्रभ्या प्रियकरा, होतासी बहु दिवस असा सखया
अमूर्त तू कल्पना एक मधु-मधुर अशी हृदया।।
शीघ्रची सोडुनि अंक जननीचा दुडुदुडु धावत तू
घरात फिरता डोळे भरूनी पाहिन हा हेतू।।
धरूनि मनी मी उत्सुक असता विदेश-गमनाचे।
प्रभ्या प्रियकरा। कार्य उदेले प्रियजन-विरहाचे।।
अशा काव्यातून त्यांच्या वाहू लागल्या.
महाराष्ट्र-वाक्सुंदरीसवें श्रीगोविंदाते
विहार जेथे अखंड सुंदर-मणिमय मंदिर ते।।
तुला गेह हे यास्तव अर्पी सरस्वती स्वकरे
जिथे क्रांतिचे शिवू न शकती अग्नि-मेघ-वारे।।
अक्षर-मंदिरि नांद सदोदित सलील बाळा, ह्या
अमूर्त तू कल्पना एक मधु-मधुर अशी हृदया।।

क्रांतीच्या झंझावातात हे माझं हृदय-देह सापडलेला म्हणून तुला राहण्यास सुरक्षित नाही. म्हणून तुझी स्मृती चिरकाल सुरक्षित राहावी यास्तव गोविंदसिंहाच्या पराक्रमाचा गौरव ज्या शीखेतिहासांत आहे त्या इतिहासाचा मराठीत रचलेला जो ग्रंथ मी लिहिला तो तुझ्या नावे अर्पण करतो. म्हणजे तो ग्रंथ आहे तो तुझी स्मृती राहील. अशा भावनेने ही कविता अर्पणपत्रिका म्हणून लिहिली. लंडनमध्ये १९०९ला ही कविता लिहिली-

पश्चातलेख
जिथे न शकती शिवू भासले अग्नि-मेघ वारे
तिथेहि शकले शिवू क्रांतिचे अग्निमेघ बा रे।।

- अंदमान १९१२

परंतु सावरकरांचा तो शीखेतिहासही जप्त झाला. प्रसिद्ध होण्यापूर्वीच हस्तलिखित धरले गेले. क्रांतीच्या आगीत जे स्थान सुरक्षित वाटले तेही त्या आगीत दग्ध झाले, त्या आश्चर्याचा वरील पश्चातलेखात उल्लेख आहे.

**सांत्वन-करुणोदात्त कविता**

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे क्रांतिकार्य इंग्लंडमध्ये जोरात चालले होते आणि त्याचे तीव्र पडसाद भारतात उमटत होते. अभिनव भारताच्या कार्यालयांवर धाडी आणि कार्यकर्त्यांची छळणूक, धरपकड होत होती. कवी गोविंदांची, रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले? अशा स्फूर्तिदायक कवितांची पुस्तिका प्रकाशित केली म्हणून ज्येष्ठ बंधू बाबाराव सावरकरांना अटक करून जन्मठेप, काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. पुढे लवकरच धाकटे बंधू डॉ. नारायणराव (बाळ) यांनाही अटक झाली. या दोन्ही बातम्या गणेशपंतांच्या म्हणजे बाबारावांच्या पत्नी यशोदाबाई (येसूवहिनी) यांनी सावरकरांना विलायतेत कळविल्या. तेव्हा संत्रस्त झालेल्या आपल्या दुःखी भावजयीस, सौ. येसूवहिनीस त्यांनी 'सांत्वन' नावाची करुणोदात्त विख्यात कविता लिहिली.

जयासी तुवां प्रतिपाळिलें। मातेचे स्मरण होऊ न दिले
श्रीमती वहिनी वत्सले। बंधु तुझा जो तुज नमीं।।
धन्य धन्य आपुला वंश। सुतिश्चये ईश्वरी अंश
की रामसेवा-पुण्य-श्लेष। आपुल्या भाग्यीं लाधला।।
अनेक फुले फुलती। फुलोनिया सुकोन जाती
कोणी त्यांची महती गणती। ठेविली असे?।।
मात्र अमर होय ती वंशलता। निर्वंश जिचा देशाकरिता।।

१९१० च्या मार्चमध्ये सावरकर विलायतेत पकडले गेले. तेव्हा या जन्मात जिची पुन्हा भेट होणे जवळजवळ असंभवनीय झालेले होते. त्या पूजनीय वहिनीस कटू कर्तव्य, उदात्त, आकर्षक, दिव्य मर्म व्यक्त करणारी 'माझे मृत्युपत्र' ही कविता लिहिली.

मार्सेलिस बोटीवरून निसटण्याचा प्रयत्न केला, त्याचा सूड म्हणून आपला अमानुष छळ होणार या जाणिवेने अशा छळास पुरून उरेल अशा धैर्याचा पुरवठा करण्यासाठी कवचमंत्र म्हणून आत्मबल अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला। मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला' कविता लिहिली.

सावरकरांच्या जन्मजात दैवी प्रतिभेतून आणि अंतर्मुखतेतून अभिजात काव्याचा जन्म झाला. सावरकर महाकाव्याचे धीरोदात्त नायक असणारे महाकवी होते. जगाच्या इतिहासात सावरकरांसारखा शतपैलू महापुरुष होणे नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांना कोटी कोटी प्रणाम!

♦

# माझ्या लेखन प्रवासातील मैलाचे दगड

• संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ८२३७९३३०६८/९४२१७४०८९४

**मा**झा लेखन प्रवास आणि त्याचा विकास ह्या पहिल्याच प्रकरणात मी माझ्या लेखन प्रवासाबद्दल लिहिलेले आहे. त्याला पुस्तक रूपात का आणले, त्याबाबत हे मनोगत. इसवी सन १९८०-८१ पासून माझे लेखन प्रकाशित होऊ लागले. पण ते मुख्यतः वर्तमानपत्रातून. तेही प्रामुख्याने श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आणि माझे डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन या बाबतचे होते. १९९६ ला जेव्हा पहिल्यांदा नॅक कमेटीच्या तयारीसाठी महाविद्यालय आणि श्री. हव्याप्र. मंडळासंबंधित प्रकाशित लेखनाच्या कात्रणाचा अल्बम मी तयार करीत होतो, तेव्हा अल्प प्रमाणात मी जे अन्य अवांतर विषयावर लेखन केले होते त्याचीही कात्रणे मी वेगळी काढून ठेवली होती. ती अचानकपणे आलमारी आवरताना आढळून आली आणि मी नॉस्टेल्जिक झालो. कात्रणे, वर्तमानपत्राची असल्याने जीर्ण होऊ लागली होती.



२०१३ साली सेवानिवृत्त झाल्यावर रिकामपण मिळाल्यामुळे अवांतर वाचन आणि लेखनालाही बरीच गती आली. प्रकाशित लेखनाचाही संग्रह वाढू लागला. हेही लेखन वर्तमानपत्र आणि दिवाळी अंकातील. त्यामुळे अल्पजीवी. २०१७-१८ पासून स्मार्टफोनचा वापर वाढला आणि त्यावरील मराठी लेखनाची सवयही झाली त्यामुळे व्हॉट्सॲपवरही लेखन आणि कविता करणे यांनी चांगली गती घेतली. नंतर कोविड-१९च्या लॉकडाऊनमुळे आयुष्यात रिक्तपणा येऊन रिकामपणाची पोकळी निर्माण होण्याची भीती निर्माण झाल्याने पुन्हा स्वतःला बागकाम, फोटोग्राफी, लेखन आणि कवितेत गुंतवून घेतले. या दीड दोन वर्षांत पुन्हा भरपूर लेखन आणि कविता केल्या. पण हेही मोबाइलवर. त्यामुळे अल्पजीवी. कारण कधी मोबाइलच्या मेमरीची, कधी चार्जिंगची समस्या आणि हँडसेट बदलला की पुन्हा आधीच्या मोबाइलमधील कविता आणि लेखन जतन करून ठेवण्याची समस्या.

मग सहज माझ्या पहिल्या पुस्तकाचे कॉम्प्युटर सेटिंग आणि प्रिंटिंग ज्या मित्राने, गणेश नारखेडेने केले त्याला फोन केला आणि विचारले की, त्याला वेळ आहे का? एक पुस्तक आणि एक कविता संग्रहाचे कंपोजिंग आणि प्रिंटिंग करायचे आहे. पण काम सरळ नाही. कारण मॅटर हस्तलिखित तयार नाही. बहुतेक सर्व मोबाइलवर युनिकोडमध्ये, काही पिडीएफमध्ये, काही पेपर कटिंग्ज रूपात आणि थोडेफार हस्तलिखित आहे. नारखेडे म्हणाला, हो लॉकडाऊनमुळे थोडाफार वेळ आहे. कन्व्हर्शन करताना थोडा त्रास पडेल, पण आता मुलगा आणि मुलगीही थोडेफार काम करू शकतात. त्यांना हाताशी घेऊन करून घेऊ. त्यामुळे गणेश नारखेडे, त्याची मुलगी कुमारी अनुष्का आणि मुलगा चि. ओम ह्यांच्यामुळे हे पुस्तक - पेपरची कात्रणे, मोबाइलमध्ये साचलेला डाटा आणि काही अप्रकाशित हस्तलिखित यातून फक्त निवडक मराठी साहित्य घेऊन हे पुस्तक आकाराला आले आहे. तिघांनाही मनापासून धन्यवाद.

माझ्यातील लेखन क्षमता ओळखून माझ्याकडून पत्रकारितेचे धडे गिरवून घेणारे आणि माझ्यात मराठी लेखनाची गोडी निर्माण करणारे माझे बंधू दै. हिंदुस्थानचे संपादक कै. श्री. डॉ. अरुण मराठे, हिंदीतून लेखनाची मुळाक्षरे गिरवून घेणारे आणि माझ्या हिंदीतील लेखनाला सदैव प्रेरणा आणि मार्गदर्शन देऊन व्यायाम - विज्ञान या त्रैमासिकात प्रकाशित करून प्रसिद्धी देणारे माझे गुरू प्रा. डॉ. रामकुमार तिवारी आणि माझे आजोबा ज्यांच्यातून वंशपरंपरेने माझ्यात लेखन गुण आले ते वेदशास्त्रसंपन्न कै. वामनशास्त्री मराठे तिघांच्या चरणी मी हे पुस्तक अर्पण करीत आहे. माझे आजोबा वामन कृष्णंभट मराठे हे ग्रंथकार होते असा उल्लेख मराठे कुलवृत्तांतात प्रथम आवृत्तीत पृष्ठ क्र. ३४२ वर, आणि द्वितीय आवृत्तीत पृष्ठ क्र. ४१३ वर आहे. पण दुदैवाने त्यांचा एकही ग्रंथ आमच्या संग्रही नाही. १८ ऑक्टोबर १९२४ ला ते स्वर्गवासी झाले. त्यांच्यातील लेखन कला आम्हा नऊ भावंडांत माझ्यात यावी हे माझे परम भाग्य. औपचारिकता म्हणून नव्हे तर मनापासून या पुस्तकाला आकार देऊन साकार करण्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सहाय्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार.

*दीपावली पाडवा (५ नोव्हेंबर २०२१)*

# आदर्श होण्याचं ओझं बाळगू नका!

(रविवारीय चिंतन)

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२८), विलेपार्ले, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो! आज महात्मा जोतिबा फुलेंची पुण्यतिथी ज्यांनी सर्व जाती-धर्मातील महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडली. महात्मांच्या स्मृतीस विनम्र वंदन. आज चिंतनाचा लेख विषयाच्या गांभीर्यामुळे थोडा मोठा झालाय, क्षमा करा.

माझी एक उत्तर कर्नाटकात राहणारी चुलत बहीण ही आदर्श आई, आदर्श पत्नी, आदर्श सून, आदर्श भावजय, आदर्श काकी, आदर्श मामी आणि आता आदर्श आज्जी म्हणून नातेवाइकांमध्ये सुप्रसिद्ध आहे. तिचा दिवस सकाळी पाचला चालू होतो तो रात्री अकराला संपतो. दुपारी दहा मिनिटांची वामकुक्षी होत असेल. रविवारी आठवड्याची राहिलेली कामेही करत असते. आठवड्यातून एकदा संध्याकाळी संपूर्ण परिवारासोबत हॉटेलिंग करते, तेवढाच विरंगुळा. तिचं लग्न ठरलं तेव्हा काकूंनी (तिची आई) तिला सांगितलं होतं - ''मोठ्या परिवारात जाते आहेस. सगळ्यांची मने जिंक म्हणजे आपसूकच कुटुंबातील तुझं महत्त्व वाढत जाईल.'' तेव्हापासून आमच्या बहिणाबाई काटेकोरपणे नि सातत्याने प्रत्येकाचं मन सांभाळत आल्या आहेत. पारंपरिक (!) वातावरण असलेल्या सासरी धुणीभांडी सोडल्यास सगळी कामे हिनेच करायची. नाश्ता - दोन वेळची जेवणं - सकाळ दुपारचे चहा आणि त्यातील वैविध्य सांभाळायचं. 'सासू' फक्त 'सारख्या सूचना' देत असलेली. सासऱ्यांना नातेवाईक आणि मित्र बरेच असल्याने त्यांचा पाहुणचार दिवसाआड ठरलेला. उत्सव, सण, नवस, पुण्यतिथ्या आणि जन्मतिथ्या, समाजाचे आचार्य (!) वर्षातून किमान दोन वेळा आठ-आठ दिवस यांच्याकडेच मुक्कामाला. अत्यंत श्रद्धेने त्यांची सेवा करण्यात हिचा सिंहाचा वाटा! आरारारारारा... आमची बहीण म्हणजे एक 'शक्तिशाली रोबो' जो सतत हास्यवदनाने सेवेला तत्पर. हिला तीन पोरं. आदर्श आई म्हणून त्यांचं सगळं करणं आलंच. हिची मुलगी 'पुढच्या पिढी'तील म्हणून तिचं करिअर महत्त्वाचं. यामुळे ती आईला फारसा वेळ देऊ शकत नाही.

थोडक्यात असं की एकदा आपण 'आदर्श' आहोत म्हटल्यावर आदर्शत्वाच्या परिमाणावर कुठेही कमी पडायचं नाही या स्वनिर्मित ओझ्यामुळे माझ्या बहिणीने स्वतःचं असं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडवलंच नाही. तिच्या अन्य कलागुणांना वाव असा मिळाला नाहीच. तिनेही तशी अपेक्षा अथवा जाणीव बाळगली नाही. उदात्त पारंपरिक व्याख्येनुसार आणि पुरुषसत्ताक अपेक्षांनुसार कुटुंबासाठी राबणं हेच 'व्यक्तिमत्त्व' आणि अधूनमधून राबण्याचं कौतुक हेच 'प्रमाणपत्र'! तिलासुद्धा अशा आदर्शत्वाची न संपणारी झिंग लागल्यामुळे 'समर्पित जीवन' हीच तिच्या आयुष्याची मोठी कमाई. परंतु तिला गृहीत धरत आयुष्यभर काम करवून घेणारे आपापल्या करिअरमध्ये रमत राहिले. साठी ओलांडल्यानंतर, आज्जी झाल्यानंतर, मधुमेह व रक्तदाब पन्नाशीतच स्वीकारल्यानंतर माझी ही बहीण कृतकृत्य झाल्यासारखी हल्ली समाधानी तर दिसते. सुनांना वेळ मिळत नसल्याने प्रत्येक कामासाठी आता कर्मचारी नेमलेले. नव्वदीला आलेल्या हिच्या सासूला यात आता वावगं काही दिसत नाही! अर्थात या कर्मचाऱ्यांच्या कामावर बारीक देखरेख माझ्या बहिणीनेच ठेवायची. त्यांचं काम उत्तम होत असेल तर ठीक नाहीतर बहिणीवर ठपका ठरलेला. हिची शारीरिक कामे संपलीत पण मानसिक टेन्शन वाढलेलं. आदर्शत्वाची झूल एकदा पांघरल्यानंतर ती दूर कशी करायची? आजही घराघरात आपापल्या छोट्या परिघात असं आदर्शत्व जगणाऱ्या लाखो माता-भगिनी आहेत ज्यांना स्वतःचं करिअर घडविण्याची जाणीव नाही आणि अनुमतीही नाही. काही दुढ्ढाचार्यांचं मत असतं की नोकरी करणारी स्त्री ही आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करू शकत नाही. परंतु हजारो-लाखो सारस्वतांच्या कुटुंबातील स्त्रिया नोकऱ्या करत आल्या आहेत आणि त्यांची मुले चांगली संस्कारी आहेत. माझ्याशी बोलताना माझी ही बहीण नेहमी अस्वस्थ असते कारण मी तिला 'स्वतःचं काही वेगळं कर' हे न चुकता सांगत असतो. 'आदर्शत्वा'च्या बाहेरचा मोठा परीघ मी तिला दाखवत असतो. तिची चित्रकला उत्तम आहे, तिचं भाषावैभव अफाट आहे, तिचं गणितही उत्तम आहे, ती विज्ञानाची प्रथम वर्गातील पदवीधर आहे आणि ती पाककलेत निपुण आहे. यातील कोणतीही गोष्ट तिने स्वतंत्र करिअर म्हणून विकसित केलेली नाही.

जुनाट व संदर्भहीन परंपरा जपणाऱ्या अनेक समाजांमध्ये आदर्शत्वाच्या कल्पना अगदीच फुटकळ वा खूप कमी महत्त्वाच्या

असतात. हे लोक काही 'प्रतीकां'ची सोपी पूर्तता करतात नि मग स्वतः 'आदर्श' असण्याची टिमकी वाजवत फिरतात. उद्योग–व्यवसाय–नोकरी इ. गोष्टी सचोटीने केल्या तर खरा मोठा आदर्श निर्माण होतो, हे यांना सोयीस्कररीत्या मान्य नसतं. यांच्यापैकी काहीजणांच्या ढोंगी व सोप्या आदर्शांची उदाहरणे बरीच देता येतील, जसे की काही लबाड लोक ढोंगीपणाने रोज फक्त कपाळावर गंध काढतात, प्रत्येकाला कमरेत वाकून सातत्याने नमस्कार करण्याची यांची नौटंकी, पाच वेळा प्रार्थना करण्याचा यांचा अट्टाहास, विहारात उपयोगी चर्चा न करता किंवा बाबासाहेबांच्या बावीस नियमांना रोजच्या आचरणात न पाळता अन्य दिखाऊगिरी करणे, संत बसवण्णांनी सांगितलेली इष्टलिंगाची मूळ संकल्पना व वचनांची पूर्तता न करता अवडंबरात रममाण होणे इत्यादी. हां, काही आदर्श मात्र कालातीत असतात जसे की स्त्रियांचा आदर करणे, सत्य बोलणे, भ्रष्टाचार न करणे इ. काही परंपरा या काळानुसार बदलायला हव्यात. उदाहरणार्थ, घुंघट वा बुरख्याची आज गरज नाही, सोवळ्यापेक्षा मानसिक स्वच्छता महत्त्वाची, कर्मचारी हे गुलाम नसून सहकारी आहेत ही भावना व तसे आचरण महत्त्वाचे, एकच आचार्य हा सर्वगुणसंपन्न नसतो ही तार्किकता इ. ''शास्त्रात सांगितलंय'' असं जातायेता म्हणत आदर्शांच्या जुनाट व्याख्या समाजावर लादण्याचा निर्बुद्ध खेळ आजही खेळला जातो. ''काळानुरूप सुयोग्य जीवनपद्धती अंगीकारणे म्हणजेच धर्म पाळणे'' ही धर्माची व धार्मिक आदर्शांची सुटसुटीत व्याख्या वर्चस्ववादी मंडळींना मान्य नसते. सुदैवाने हे वर्चस्ववादी लोक हल्ली दुर्लक्षिले जाताहेत. 'आदर्शां'ची व्याख्या ठरविण्याची यांची मक्तेदारी आज जवळपास संपलेली आहे. आमच्या तरुण पिढीला नवनवीन वैश्विक आदर्शांची परिमाणे आज उपलब्ध होताहेत.

तुम्ही जेव्हा ''आदर्शां''च्या इतरांनी केलेल्या व्याख्या न तपासता अंगीकारता तेव्हा तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि पराक्रमाचा क्षय सुरू होतो. पूर्वी इंजिनीअर किंवा डॉक्टर होणे हा पुरुषार्थाचा आदर्श मध्यमवर्गीय चौकटीत मानला जायचा. स्त्रीने उत्तम संसार करीत कुळाला वारसदार द्यावा, हा स्त्रित्वाचा आदर्श समजला जायचा. या सगळ्या व्याख्या आम्हीच करायच्या आणि त्यांच्या चक्रव्युहात अडकून रहायचं. गेली कित्येक शतके काही वर्चस्ववादी समाज नि त्यांचे अहंकारी म्होरके या व्याख्या करत राहिले आणि समाजाच्या चालीरीती म्हणून खपवत राहिले. जग पाहणारी व अनुभवणारी आजची युवापिढी आता या प्रकारांनी गंडत नाही. ती भामट्या आदर्शांची न घाबरता चिरफाड करते. पूर्वी शंका किंवा प्रश्न न विचारता बाप किंवा गुरुजी जे सांगायचे ते डोळे मिटून आचरणात आणणाऱ्या मुलाला किंवा शिष्याला आदर्श मानले जायचे. 'आज्ञाधारी' असणे म्हणजे 'आदर्श' असणे! आज्ञांची व ते देणाऱ्यांची योग्यता तपासण्याचा इथे अधिकारच नाही. पुरुषाशी वाद न घालता त्याचे वर्चस्व मानणारी स्त्री ही शास्त्राच्या चौकटीत राहिली की 'आदर्श' समजली जायची. हा पुरुषी अहंकार आजही उत्तर भारतीय पट्ट्यात भरभरून दिसतो. भरपूर दूध देणारी, कमी चारा खाणारी, लाथा न मारणारी अशी गाय ही 'आदर्श'! तद्वतच जीवनभर कुटुंबीयांसाठीच फक्त खपणारी स्त्री ही सुद्धा या ढोंग्यांसाठी 'आदर्श'.

तुमच्या व्यक्तिमत्त्वाला, ध्येयांना, प्रयत्नांना व त्यांच्या परिणामांना उगाच सातत्याने इतरांच्या आदर्श मोजपट्टीने मोजू नका. हां, आपली कामगिरी मोजण्याचे योग्य परिमाण (बेंचमार्क्स) हे हवेतच. परंतु त्यांची निवड करताना इतरांनी सांगितलेल्या प्रचंड मोठ्या आदर्शांच्या ओझ्याखाली स्वतःला चिरडून टाकू नका. बेडूक हा कधी झाड चढू शकणार नाही किंवा मासा हा पाण्याबाहेर राहू शकणार नाही. तुमचं व्यक्तिमत्त्व स्वतंत्र व विशेष आहे, जे तुम्हीच जोखायचंय. बऱ्याचदा प्राचीन इतिहासातील काही आदर्श व्यक्तिमत्त्वांची उदाहरणे देण्याची आमच्याकडे एक भारदस्त पद्धत आहे. यातील बऱ्याच व्यक्तिमत्त्वांची विवेकाच्या सामान्य कसोट्यांवर जरी चिरफाड केलीत तरी त्यांच्यातल्या कमतरता लक्षात येतात. आजच्या संदर्भात तर त्या अधिक गंभीर वाटू लागतात. काही गंभीर मिथकांच्या आवरणाखाली काही बोगस आदर्शे आमच्या माथी मारण्यात आली आहेत. सारासार विवेक जर वापरला तर ही मिथके लक्षात येतील आणि हे सुद्धा कळेल की आपल्या मागील अनेक पिढ्या कशा गंडवल्या गेल्या होत्या! आपल्या येथील काही जातींना व समाजांना स्वतः खूप आदर्श असण्याचा मजेशीर समज आहे. यांचाच पेहराव, भाषा, खानपान, प्रार्थना, व्यायाम, काम करण्याची पद्धत, जीवनाबद्दलचा दृष्टिकोन इ. गोष्टी 'आदर्श' आहेत व बाकीच्यांच्या आदर्श नाहीत, असं यांचं आग्रही मत असतं!

माझा एक नातेवाईक त्याच्या परिचयाच्या कुटुंबातील दोन सुनांची तुलना स्वतःची 'आदर्श परिमाणे' वापरत करीत होता. पहिली सून उत्तम आदरातिथ्य करते व पाहुण्यांना (म्हणजे ह्याच्या कुटुंबीयांना!) भरपूर वेळ देते. दुसरी सून बरीच शिष्ट वाटते नि असा भावनांचा ओलावा दाखवत नाही. पूर्ण संदर्भाशिवाय सोयीने बोलण्याची लबाडी तर आमच्या जनुकांमध्ये शेकडो वर्षांची आहे. दुसरी सून नोकरी करते आणि पहिली सून घरकाम बघते, हा संदर्भ माझ्या या नातेवाइकाने लपवला. मुद्दा असा की इतरांना आवडेल

असा 'आदर्श' आम्ही बळजबरीने का अंगीकारायचा? सगळ्यांना आपण आवडलोच पाहिजे हा अट्टाहास कशासाठी? काही एक मर्यादेत जवळच्यांना आवडेल अशा काही गोष्टी सहजपणे करणे, मी समजू शकतो. आम्ही जन्म देऊन वाढवलाय, म्हणून आम्ही सांगू ते आदर्शत्व आचरणात आले पाहिजे असा मूर्खपणाचा आग्रह करणारे बरेच पालक मी आजही बघतो. यासाठी प्रसंगी ही मंडळी 'इमोशनल ब्लॅकमेलिंग'ही करतात. प्रत्येक युवकाने व युवतीने योग्यरीत्या विवेकी आणि वैज्ञानिक परिमाणांचा वापर करीत आदर्शत्वाची तपासणी करायला हवी. आई - वडिलांना आनंद आणि सुख देणे हा आपला विवेक. आणि त्यांच्या बुरसट किंवा संदर्भहीन समजुतींना धीरोदात्तपणे नाही म्हणणे व अशा नाही म्हणण्याची कारणमीमांसा त्यांना समजावून सांगणे म्हणजे वैज्ञानिक आचरण होय. तेव्हा युवामित्रांनो, तुमची संपूर्ण गुणवत्ता ही उत्तमरीत्या व आनंददायी पद्धतीने वापरात आणणारा "आदर्श" तुम्ही अंगीकारावा. "भोंगळ आदर्शा"चा मतलबी अथवा मूर्खपणाचा आग्रह धरणारी माणसे आपल्या अवतीभवती असतातच!

*Copyright © jakhotiya.com*
*Right to change/reproduce withheld, IPC copyright Act 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.*
*वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता येईल.*

♦

## सहवेदना



श्री. सदानंद रामकृष्ण खांबेटे, रा. ठाणे यांचे दि २८/११/२०२१ रोजी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. प्रख्यात गायिका संध्या खांबेटे ह्यांचे वडील आणि श्री. मधुसूदन ऊर्फ अप्पा खांबेटे यांचे ते ज्येष्ठ बंधू.

**सदानंद रामकृष्ण खांबेटे**
(जन्म ३१/०८/१९३३ ते मृत्यू २९/११/२०२१)
६०१ बंगश्री टॉवर, दाजी रामचंद्र रोड, चरई ठाणे ४००६०१.

# उल्लेखनीय कार्य

**- सौ. मानसी गाडगीळ**

**दि**वाळी तयारी सुरू झाली आणि आठवण झाली ती आपल्यात नसलेल्यांची, ह्यावेळी कोणाकोणाला फराळ द्यायचा ते ठरवले तेव्हाच मनात विचार आला की मराठे परिवारातील जे सदस्य आपणास सोडून गेले आहेत त्यांच्या कुटुंबीयांना फराळ दिला तर? लगेच हा विचार सौरभ मराठे व मराठे प्रतिष्ठान पुणे शाखा अध्यक्षा अंजली विजय ह्यांच्या कानावर घातला. त्यांनी लगेचच होकार देऊन पुढील कार्यवाही करण्याबाबत सौ. निलांबरी मार्गदर्शिका यांचेबरोबर संपर्क साधून योग्य तो निर्णय घेण्यात आला. परिवारातील ज्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचे दुःखद निधन गेल्या दिवाळीपासून या दिवाळीच्या आधी महिनाभरपर्यंत झाले अशा घरी दिवाळी फराळ देण्यात आला.

**त्याप्रमाणे खालील कुलबांधवांना दिवाळी फराळ देण्यात आला.**

१) श्री अरुण राव यांची पत्नी कै. सौ. अंजली अरुण निधन तारीख २६.०६.२०२१
२) डॉ. राहुल यांची आई कै. डॉ. सौ. ललिता रमेश निधन तारीख १६.०८.२०२१.
३) आपले विश्वस्त श्री. मोहन राव यांची पत्नी कै. सौ. सुषमा मोहन निधन तारीख १९.०९.२०२१.
४) सौ. प्राजक्ता कुलकर्णी हिचे वडील आणि आई कै. सदाशिव गोपाळ जोशी निधन तारीख ०५.०४.२०२१ आणि कै. सौ. सुनंदा सदाशिव जोशी निधन तारीख ०७.०४.२०२१.
५) चंद्रशेखर विद्वांस यांची आई कै. श्रीमती जयश्री जयंत विध्वांस निधन तारीख ०२.०१.२०२१.
६) प्रसाद व्यंकटेश मराठे यांची आई श्रीमती प्रभा व्यंकटेश मराठे निधन तारीख २२.०९.२०२१.
७) दिपा मराठे हिची आई कै. श्रीमती जयश्री विनायक मराठे निधन तारीख २१.०७.२०२१

या उपक्रमात श्री. योगेश व सौ. मानसी, श्री. सौरभ, विजय (कार्याध्यक्ष मराठे प्रतिष्ठान) यांची बहुमूल्य साथ लाभली तसेच सौ. निलांबरी (मार्गदर्शिका), हेमंत (कार्यवाह) श्रीनिवास (कुलवृत्तांत विभाग) यांचे मार्गदर्शन लाभले म्हणून हे काम झाले.

♦

# ललित साहित्य...

◆ राधा श्रीकांत मराठे (पृ.३७८), पुणे

**सा**हित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर थोडं ललित साहित्याबद्दल...



लेखनाच्या अनेक प्रकारात ललित लेखन हा लोकप्रिय प्रकार आहे. मराठीतल्या प्रणय कादंबरीचे प्रणेते ना, सी. फडके या साहित्य प्रकाराचे जन्मदाते असं म्हटलं तर चूक ठरू नये. याआधी लिहिलं गेलंच नाही असं नसेल पण ललित लघुलेख हा प्रकार फडक्यांनी लोकप्रिय केला.

कोणत्याही विषयावरची तांत्रिक माहिती न देता, किंवा ती माहिती देताना सुध्दा थोडं भावनिक अंगाने लिहिलं की ते ललित होतं. उदा. स्त्रीच्या बाळंतपणाबद्दल लिहिताना गर्भधारणा, गर्भाची वाढ वगैरे तपशील दिले तर तो प्रसूतीविषयक माहिती देणारा लेख होतो. पण तोच 'बाळाची चाहूल', 'डोहाळे' अशा शीर्षकांनी लिहिला आणि त्यात बाईची बदलती मानसिकता, तिचे बदलते रूप, गर्भाच्या वाढीबरोबर बदलणारं तिचं रोजचं आयुष्य यांचं वर्णन केलं की तो ललित लेख.

मी काश्मीरला गेले तर कशी गेले, बुकिंग कसं केलं, कोणत्या प्रवासी कंपनीबरोबर गेले, कुठे राहिले, कशी फिरले, खर्च किती आला वगैरे माहिती हे प्रवास मार्गदर्शन होईल. पण काश्मीरचं सौंदर्य, तिथला वेगळेपणा, तिथल्या संस्कृतीमधील आवडलेल्या/नावडलेल्या गोष्टी यांच्याबद्दल मी काही लिहिलं तर तो ललित लेख.

चराचर सृष्टीतील कोणताही विषय ललित लेखाला वर्ज्य नाही. चंद्र हा सर्वात लाडका विषय. नंतर तरुण स्त्री, तान्हं बाळ वगैरे. मराठी भाषेतील उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अतिशयोक्ती वगैरे अलंकारांनी याला सजवतात. पण एखादाच ठळक दागिना घातलेली सौंदर्यवती आणि दागिन्यांच्या दुकानातली दागिन्यांनी मढलेली निर्जीव बाहुली यांच्यात जो फरक तो या अलंकारांच्या वापरातही. मोजके आणि नेमके अलंकार लेखाचं सौंदर्य आणि रोचकता वाढवतात. आणि प्रमाण जास्त झालं की मूळ विषय काय ते कळेनासं होतं.

माझा हा लेखही 'ललित-माहितीपर' प्रकारात मोडतो. कारण ललित म्हणजे काय याची माहिती मी दिली आहे. पण लेख कसा लिहावा त्याबद्दल मी काहीही लिहिलेलं नाही. सुरुवात कशी असावी, विषय कसा फुलवावा, शेवट कसा करावा, शब्दसंख्या किती असावी याच्या सूचना दिल्या तर तो लेखनविषयक मार्गदर्शन करणारा लेख ठरला असता. (ही फारच ढोबळ माहिती आहे. परीक्षेसाठी जरा अधिक तपशील अभ्यासावे लागतात. पण ललित लेख म्हणजे काय या प्रश्नाचे हे माझ्या मते यथोचित उत्तर ठरावे.)

ललित लेखनाचा एक लोकप्रिय प्रकार म्हणजे कथा. आता मुळात ललित लेखन हे वास्तवावर आधारलेला कल्पनेचा डोलारा अशा स्वरूपाचं असतं, त्यामुळे कथेत कल्पनेची भरारी असणार हे उघड आहे. पण प्रत्येक कथा प्रकारात कल्पनेचा आविष्कार वेगवेगळ्या पद्धतीने केलेला आपण पाहतो.

कथेचे तर अनंत प्रकार आहेत - प्रेम कथा, कुटुंब कथा, विद्रोही कथा, पुराण कथा, ऐतिहासिक कथा, नव कथा, भय कथा, रहस्य कथा हे आपल्या ओळखीचे काही प्रकार. कथेत एक मुख्य सूत्र आणि उद्देश असावा लागतो. नायक/नायिका, त्यांच्या आजूबाजूची माणसं ही गरजेप्रमाणे असतात. म्हणजे एखादी कथा नायिकेची असते, त्यात इतरांना कमी अधिक महत्त्व असतं. एखाद्या कथेत नायक असतो. नायक-नायिकेचं वय, शिक्षण, आर्थिक/सामाजिक परिस्थिती, धर्म, जात, राष्ट्रीयत्व लेखकाच्या मर्जीनुसार ठरतं. पण कथेत निव्वळ निवेदन नसतं. त्या निवेदनाला थोडी भावनिक डूब असते. अगदी विद्रोही कथा असली तरी विद्रोहातली जळजळीत धार वाचणाऱ्याला जाणवली पाहिजे.

मी एखाद्या भाजीवालीची कथा लिहिणार असेन तर ती घाऊक बाजारात जाते, भाजी विकत घेते, त्यांचे वाटे करते, ठरावीक ठिकाणी बसून विकते ही तिची दिनचर्या आणि व्यापाराचे तपशील, आकडे लिहिले तर ती कथा नाही होणार. भाजीविक्री करण्याच्या व्यवसायाचे तपशील. पण भाजीचा धंदा करण्यामागची तिची कारणं आणि मानसिकता, भाजी विकताना तिला आलेले अनुभव, गिऱ्हाईक कोण आहे-कसं आहे हे पारखताना तिने लावलेले निकष, त्यावरच्या तिच्या मनात उमटणाऱ्या प्रतिक्रिया या सगळ्याचे चित्रण मी करीन. ते काल्पनिक असेल माझ्यापुरतं. पण एखाद्या भाजी विकणाऱ्या बाईच्या मनात खरोखर ते विचार

येऊ शकतात हे मी विसरून चालणार नाही, वाचकांना हे सगळं स्वाभाविक वाटायला हवं. ती कथा वाचताना त्यांना आपण रोज भाजी घेतो ती बाई आठवली पाहिजे. पुरुष भाजीवाला असेल तर त्याची बायको/आई/बहीण अशीच कुठेतरी भाजी विकत असेल आणि ती अशीच असेल असे चित्र मनात उभे राहिले पाहिजे. भाजीवालीला घर असतं, आई-बाप, सासू-सासरे, भावंडं, नवरा-मुलंबाळ असतात, तिच्या वस्तीत तिच्या शेजारणी, मैत्रिणी असतात, तिला उधार माल देणारे दुकानदार असतात, तिच्या बाईपणाचा फायदा घेऊ पाहणारे खलप्रवृत्ती पुरुष असतात. या सगळ्या वास्तवाची कल्पना करून ते खरं वाटेल अशा पद्धतीने शब्दबद्ध करणं हे यशस्वी कथालेखन ठरावं.

हे केवळ उदाहरण दिलं. अधिक नेमकं लिहायचं तर आपण जे वाचतोय ते स्वत:ला लागू करून पाहिलं तरी ते खोटं किंवा अतिरंजित वाटता कामा नये. मनुष्य स्वभावाला वेगवेगळे कंगोरे असतात. ते त्यांच्या वेगळेपणासकट सूक्ष्म तपशिलात वर्णन केले गेले तर ते वाचणाऱ्याला जवळचे वाटतात. ते वाचताना भोवतीच्या व्यक्तींपैकी एखाद्या व्यक्तीची आठवण येणं हे त्या व्यक्तिचित्रणाचं यश मानावं लागेल.

माणसाचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्तर बदलला की त्याच्या मानसिकतेत पडणारे फरक कथेत दिसले पाहिजेत. वेगळ्या स्तरातल्या माणसाचं वेगळं वागणं, किंवा एकाच माणसाचा स्तर बदलला की त्याचं बदललेलं वागणं किंवा स्तर बदलला तरी वागण्यात न झालेला बदल असा कुठल्याही अंगाने झालेला किंवा न झालेला बदल टिपण्याची तरलता आणि त्याचं यथार्थ चित्रण कथेचा प्राण असतं.

आपण घडवलेल्या मूर्तीत प्राण फुंकण्याचं कसब म्हणजे कथालेखन असं म्हटलं तरी चालेल.

अलक म्हणजे अति लघुकथा हा एक नवा प्रकार अलीकडे सामाजिक माध्यमांत लोकप्रिय झालेला आहे. हा लघुकथेचाच एक आधुनिक आविष्कार. थोडक्यात, फार वर्णन न करता नेमका कथाभाग लिहिलेली ती लघुकथा. ही स्पष्ट असते. काय चाललंय ते लगेच कळतं. पण अलकमध्ये हा कथाभाग इतका संक्षिप्त येतो की वाचकाला त्याच्या कल्पनाशक्तीला ताण द्यावा लागतो. लेखकाने लिहिलेल्या ४-५ ओळींचा संदर्भ कशाशी आहे, वर्णन केलेल्या घटनेच्या पूर्वी काय घडलं असेल, कसं घडलं असेल, कथेत आणखी कोण पात्रं असू शकतील आणि आता इथून पुढे या घटनेचे कोणते पडसाद संबंधितांच्या आयुष्यात उमटू शकतील या सगळ्याचा तर्क वाचकाला करावा लागतो. प्रत्येक वाचकाची भावनिक तरलता, अनुभवाची व्याप्ती, कल्पनाशक्ती, स्वभावातली भावुकता आणि वास्तवाला सामोरं जाण्याची भावना वेगवेगळी असते. त्यानुसार कथा वाचून मनात प्रतिक्रिया उमटते. **उदा.**

पावसाच्या अवेळी कोसळण्यामुळे वाहतूक कोसळली आणि जागोजागच्या हिरकण्या आपापला गड उतरायला लागल्या.

या एका ओळीच्या 'अलक'मध्ये किती गोष्टी आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. ज्यांनी मुंबईच्या लोकल प्रवासाचा अनुभव घेतलाय त्या आणि ज्यांनी नाही घेतलाय त्याही नुसत्या कल्पनेने या वाक्यातली भीषणता कल्पून थरथरतील. कासावीस होतील. आपण कधी अशा अडकलो तर आपलं घर, मुलं, घरातली वडील माणसं काय करतील या कल्पनेने रडकुंडीला येतील. रात्रीच्या काळोखात रायगड उतरणाऱ्या हिरकणीची आठवण करतील आणि तिच्याकडे धैर्य मागतील. तिने पाठीशी उभं राहावं यासाठी मनोमन तिची प्रार्थना करतील. वाचणाऱ्या बायका आणि पुरुषही पाहिलेले, ऐकलेले किस्से आठवून अस्वस्थ होतील. अशी परिस्थिती कुणावर येऊ नये यासाठी देवाची प्रार्थना करतील. दिवसभर हे विचार त्यांचा पिच्छा पुरवतील. त्यांचं मन व्यापून टाकतील. इथे त्या अलकचा हेतू पुरेपूर सफल होतो.

याउलट, ती कालची चांदणी आज परत दिसेल म्हणून तो खास तयार होऊन बाहेर पडला आणि ती चांदणी तिच्या लेकरांना घेऊन बाहेर पडलेली पाहून चेहरा कुठे लपवू असं झालं त्याला.

या अलकमध्ये त्या चांदणीची चमचम, नखरा - तो पाहून त्याचं घायाळ होणं, विरघळणं, तिच्या विचारात रात्र जागवणं, हे सगळं डोळ्यांसमोर उभं राहतं आणि त्याच्या फजितीनंतर त्याचा चेहरा कसा झाला असेल त्या कल्पनेने जे हसू फुटतं ते दिवसभर मनाला गुदगुल्या करत राहतं.

पण अलक लिहिताना भाषेच्या वैभवाची दिमाखदार मांडणी नाही करता येत. भाषेवर असलेलं प्रभुत्व कमी शब्दांत प्रत्ययकारी आशय यासाठी खर्च होतं. भाषेचे अलंकार दुर्लक्षित राहतात. अर्थात साहित्याचे इतर प्रकार हाताळताना ते सगळं करता येतंच, पण अलकची ही एक डावी बाजू इतकंच.

वाचकाच्या कल्पनाशक्तीवर विश्वास ठेवून एक कल्पना मांडणं आणि वाचकाने त्याची आपल्या मनाप्रमाणे मांडणी करून तिचा आस्वाद घेणं ही महत्त्वाची प्रक्रिया अलक लिहून घडते. वाचक अधिक सजग, सुजाण होतो आणि त्याची वाचन अभिरुची प्रगल्भ होते. एखाद्याला त्यातून प्रेरणा मिळून एक नवा लेखकही जन्माला येत असेल. हा फायदा किती मोठा.

अगदी जिव्हाळ्याच्या भाषेत सांगायचं तर लेखक फक्त ४-५ ओळी लिहितो आणि वाचकाच्या मनात ५०० भागांची टीव्ही मालिका तयार होते, पटलं ना?

♦

# श्री गणपती मंदिर तयार होताना...

• श्री. उल्हास मराठे (पृ. ६०१), सुरेंद्रनगर, गुजरात भ्रमणध्वनी : ९८२५२२३७३८

**कथा गणपती मंदिराची**

माघी चतुर्थीचा दिवस होता. आता ऊन चांगलेच तापत होते. सुरेंद्रनगरमध्ये एकच गणपतीचे स्वयंभू मंदिर म्हणजे फाफसर गणपती. सुट्टीचा दिवस असल्याने महाराष्ट्र मंडळाचे एक एक मेंबर अचानक मंदिरात भेटत गेले. त्यातल्या त्यात आमचे घर जवळ असल्याने सर्वांना घरी चहाला चलायला पाचारण केले. गोडबोले, पेडणेकर, कुसे, खोत व इतर ३-४ जण घरी जमलो. परंतु आमच्या मंडळाचे गणपतीचे देऊळ व्हायलाच पाहिजे. अजून अनेकांची देवळाची कल्पना १० बाय १० ते दोन मजली देवळापर्यंत होती. प्रथम प्रश्न जागेचा होता. मेघाणी बाग, रेल्वे स्टेशन , ८० रोड असे अनेक पर्याय निघाले. पण जागेलाच ३ - ४ लाख (सन १९९८ साली) लागत होते. त्यामुळे विषयच थांबत होता. त्यात कोणीतरी मुद्दा काढला की जर एखाद्या सोसायटीचा कॉमन प्लॉट मिळाला तर काम सोपे होईल. मग बोलताना कोणी तरी झामवाचे नाव सांगितले. त्याचे सनफ्लॉवर स्कूलजवळ नवीन प्लॉटिंग केले आहे व तो आपल्याला स्वस्तात मिळेल.

चला सर्व मंडळी परत झामवाच्या ऑफिसला गेलो. त्याने खरोखरच नुकतेच प्लॉटिंग केले होते. अजून विकायला सुरुवात केली नव्हती. आमची कॉमन प्लॉटची डिमांड ऐकल्यावर त्याने सांगितले जर माझे निम्मे गाळे तुम्ही बुक करत असाल तरच देतो, तरीपण मी कॉमन प्लॉट आताच कन्फर्म करत नाही.

निराश होऊन आम्ही निघत होतो. तेवढ्यातच त्याने कॉमन प्लॉट कशासाठी हवा आहे ते विचारले. आम्ही गणपती मंदिरासाठी हवा आहे असे सांगितल्यावर तो डोळे मिटून शांत बसला व आम्हाला पण बसायला सांगितले. पुढे म्हणाला, ''मी गणपतीचा मोठा भक्त आहे. आज माझा निर्जळी उपास आहे. तुम्हाला गणपतीनीच माझ्याकडे धाडले आहे. सर्वांच्या खिशात मिळून जे पैसे असतील ते द्या. आजपासून कॉमन प्लॉट तुमचा!!'' अशी श्री गणेशाच्या इच्छेनेच मंदिराच्या कामाला सुरुवात झाली.

चांगला दिवस पाहून खात मूरत (भूमि पूजन) ठरले. नव्या जुन्यांची यादी काढून सर्वांना निमंत्रण केले. खोत काका, दुसे काका, गोडबोले काकांचा उत्साह शिगेला पोहचला.

मध्यंतरीच्या काळात गणपती मंदिराचे डिझाइन आणि मॉडेल करायचे काम माझ्यावरच सोपवले. मी भावनगरला जाताना रस्त्यात दुरूनच एक देऊळ पाहिले होते आणि ते मनात भरले होते. मुख्य देऊळ जरा उंचावर. आत गाभारा व सभामंडप चारी बाजूंनी उघडा. मस्त सर्व बाजूंनी खेळती हवा. झाले, त्याच बांधणीचे मॉडेल बनवायला घेतले. वायर कटवर पत्रे कापून गणपतभाई (श्री विनायक इंडस्ट्रीज)कडे त्याचे फॅब्रिकेटेड मॉडेल तयार झाले. एका मीटिंगमध्ये सर्वांना दाखवल्यावर सर्वांनाच ते आवडले. त्यावेळचे अध्यक्ष श्री. गोडबोले साहेब स्वत: सिव्हिल इंजिनीयर, व मी (उपाध्यक्ष) अशी आमची जोडी सर्वानुमते डिझाइनसकट मंजूर करून, मंदिर पूर्ण होईपर्यंत नक्की करण्यात आली. वरीलप्रमाणे सर्व आमच्या श्रीमती फडके काकूंनी नक्की केल्यावर सर्वांनी त्यावर शिक्कामोर्तब केले.

एकदा राणपूरला गेलो असताना समजले की स्वामीनारायण संप्रदायाचे प्रमुख स्वामी त्यांच्याकडे मुक्कामाला येणार होते. स्वामीनारायण संप्रदाय देवळांसाठी मदत करतात असे समजले होते. म्हणून मी तयार मॉडेल घेऊन त्यांच्या भेटीला गेलो. त्यांच्यासमोर मॉडेल ठेवून नमस्कार केला. त्यांनी डोक्यावर हात ठेवला व म्हणाले, ''चांगले काम आहे. देऊळ सुंदर होईल व पूर्ण होईल, चिंता न करता कामाला लागा''. त्यांचा हात डोक्यावर पडताच अंगातून एक पॉवर पसार झाली आणि अंगात नव चेतना निर्माण झाली.

त्यानंतर भूमिपूजनाला सुरेंद्रनगरच्या स्वामीनारायण मंदिराच्या महंतांनाच पाचारण केले व त्यांनी आमचे आमंत्रण आनंदाने स्वीकारले. त्यावेळेस मंदिराची जागा शोधत जायला लागायचे. आजूबाजूला बाभळीचे जंगल होते. शुभ कोपरा पाहून त्या ठिकाणी खोदकाम सुरू केले आणि ५ फुटांवर एक चांगला मोठा दगड लागला, नाहीतर आजूबाजूला फक्त काळी मातीच होती. हा एक चांगला शुभ शकुनच म्हणायचा.

झाले! आता आर्थिकबाबत जुळवाजुळव करायला हवी होती. मंडळाच्या सर्वांनी आपापल्या परीने प्रथम मदत करायची व मग आपण बाहेरच्या लोकांकडून मदत मागायची असे ठरले.

सध्याचे मंदिर ४ प्लॉटवर उभे आहे. एक कॉमन प्लॉट जिथे

शिव मंदिर आहे तो प्लॉट सर्वांनी वर्गणी काढून घेतला व जिथे गणपतीचे स्थान आहे ते बरोबर दोन प्लॉटच्या मध्यात आहे. एक श्री. गोडबोल्यांचा व दुसरा मराठ्यांचा. ते दोन्ही प्लॉट आम्ही दोघांनी पूर्णपणे मंदिराला दान केले. आता मंदिराची जागा ७२०० चौ. फूट झाली. त्यामुळे ४० फूट बाय ६० फुटांचे देऊळ होईल असे वाटले.

आता वर्गणी गोळा करायची. इथल्या पद्धतीप्रमाणे जे वर्गणी देतील त्यांच्या नावाची लादी बसवायची. मग किती रुपये दिले तर लादी किती मोठी लावायची. याला विरोध करणारा मी एकटा. सर्वांच्या मते लादी नाही लावली तर कोणी मदत करणार नाही. त्यावर खूप वादावादी झाली. माझे म्हणणे होते, देवाच्या ठिकाणी देणगीदारांची नावे लावणे म्हणजे देवापेक्षा देणगीदारांना जास्त महत्त्व देण्यासारखे होते. आमचा अंदाजे खर्च २० लाख रुपये होता. म्हणजे २५०००/- रु.ची लादी लावली तर ८० लाद्या लावायला लागल्या असत्या.

थोड्याच दिवसात डिलक्स बेअरिंगच्या दिलीपभाई राठोड यांना मुंबईत भेटण्याचा योग आला. जेव्हा लक्साईट युनिट चालू केले तेव्हा ते म्हणाले होते की, तू मुंबईतून यंग मुले घेऊन ये, माझा मराठी लोकांवर जास्त भरवसा आहे. आमचे गुजराथी थोड्याच दिवसात स्वतःचा उद्योग सुरू करायचा विचार करतात. दिलीपकाका किती देणगी देतील याचा काहीच अंदाज येत नव्हता. घाबरत घाबरत मी त्यांना मॉडेल दाखविले. ते खूश दिसले व मला म्हणाले, ''किती रुपये पाहिजेत.'' मी काहीच बोललो नाही. मग त्यांनी चेकबुक काढले व मला म्हणाले, ''मी १ चा आकडा लिहिला आहे आता शून्य देत जातो.'' तू थांब म्हणेपर्यंत मी शून्य देत जाणार. त्यांनी चार शून्य दिल्यावर मी थांबा म्हणालो. त्यावर त्यांनी आणखी एक शून्य दिले व ते थांबले. अशा रीतीने पहिलीच देणगी एक लाखाची, कोणत्याही अटीशिवाय, 80G शिवाय मिळाली व आता आम्हाला कामाचा जोर आला. देणग्या मिळत गेल्या व काम पुढे सरकत गेले.

दोन मजली बिल्डिंग उभी राहिली. गोडबोले काका सिव्हिल इंजिनीयर व त्यांचे या भागात चांगले नाव असल्याने काम फारच सुंदर व शीघ्र गतीने होत होते.

आता गणपतीची मूर्ती आणायची. सर्वानुमते मंदिराचा आकार व गाभाऱ्याचे माप पहाता, कमीतकमी चार फूट उंचीची तरी मूर्ती हवी होती. मंदिराचे बांधकाम करणारे श्री. गजानन सोमपुरा यांच्या सांगण्यानुसार आम्ही चार जणांनी जयपूरला जाऊन मूर्ती ऑर्डर करण्याचे ठरले. माझ्या मनात ती आधीपासूनच कोरलेली होती. तीन पेट्रोल पंप, ठाणे येथे एक गणपतीचा कारखाना होता. तिथे मी बऱ्याच मूर्ती पाहिल्या होत्या. गणपती आरामात विसावलेला हवा होता. मग माझ्या व्याह्यांना मी ही कामगिरी दिली व त्यांनी तिथे जाऊन तीन चार फोटो काढून धाडले. तेच फोटो घेऊन मी, खोत काका, पेडणेकर काका व अणिक दोन जण मिळून जयपूरला गेलो. माधव मूर्ती भांडार म्हणून एका दुकानात गेलो. अचानक बोलताना लक्षात आले, की ते सध्याचे जयपूरचे संघचालक आहेत. मग काय, घरचा माणूस मिळाल्यासारखेच वाटले. त्यांनी चांगला डिस्काउंट देऊ केला व एक महिन्यांनी परत बोलावले. तोपर्यंत मूर्तीचा ढाचा तयार होणार होता. मूर्ती संपूर्ण एका दगडातून करणार होते. त्यावर कुठेही साधा काळा किंवा इतर रंगाचा डाग असणार नव्हता. किंमत एक लाख रुपये नक्की झाली. काहींना ती फारच जास्त वाटली पण गजानन भाईंनी ती किंमत खूपच वाजवी असल्याचे सांगितले व आम्ही ११ हजार ॲडव्हान्स देऊन परत आलो. आता डोनर शोधायचे. बऱ्याच जणांनी धनजी पटेलांचे नाव सांगितले. माझा त्यांचा १९८१ पासूनचा के.सी.आय.च्या जसूभाईंमुळे परिचय असल्याने मी व तीनचार जण त्यांना भेटायला गेलो. तोपर्यंत मंदिर उभे राहिले असल्याने सर्वांना त्याच्या भव्यतेची कल्पना आली होती. चार फूट उंचीची मूर्ती धनजी भाईंना पटली. नेहमी धनजी भाईंचा नावासाठी आग्रह असतो पण आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनी नावाशिवाय रु.५१०००/- देण्याचे नक्की केले. माझ्या चेहऱ्यावरची काळजी पाहून त्यांनी विचारले, ''अजून काही प्रॉब्लेम आहे का?'' तेव्हा मी घाबरतच त्यांना मूर्ती १ लाखाची असल्याचे सांगितले. ताबडतोब त्यांनी सांगितले जी किंमत असेल ती, पण सर्व रक्कम त्यांनीच द्यायचे कबूल केले. झाले, एक मोठा प्रॉब्लेम सॉल्व्ह झाला. कारण मंदिर व्हावे ही तो श्रींची इच्छा. आम्ही निमित्त मात्र होतो.

आता सगळ्यांना हुरूप आला. बिल्डिंगची वास्तुशांत आधी करावी लागते मग मूर्तीची स्थापना करावयाची. आता शांतीसाठी कोण बसणार? सर्वानुमते श्री. व सौ. मराठे यांच्या हस्ते वास्तुशांत, गोडबोले काका, काकूंच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि श्री. व सौ. गाडगीळ यांच्या हस्ते शिखर स्थापना अशी विभागणी झाली. १६ ऑक्टोबर २००० मूर्तीच्या स्थापनेचा दिवस नक्की झाला. जणू घरचेच कार्य असल्यासारखे सर्व कामाला लागले. संपूर्ण प्रोग्रॅम तीन दिवसांत संपन्न झाला.

अशा प्रकारे आमच्या लाडक्या दैवताची स्थापना झाली व आजही दिमाखात ते मंदिर सर्वांसाठी खुले आहे.

♦

# उसाला फेअर अँड रेम्युनरेटिव्ह (FRP) किंमत

## भारत सरकार व साखर कारखाने ह्यांच्या न्यायालयीन वादात झालेले साखर उद्योगाचे चोंबाळे

• मोहन मराठे, खार भ्रमणध्वनी : ९८१९९६४७६५

**सा**खर कारखान्यांचे नवीन गळीत हंगाम सुरू होत आहेत. उसासाठी गाळपापासून १४ दिवसांत FRP देण्याचे आदेश केंद्र सरकारने काढले आहेत. त्यामुळे सरकार, साखर उद्योग, शेतकरी नेते ह्यामध्ये वाद सुरू होऊन राजकीय रंगामुळे भडक रणकंदन माजण्याची शक्यता आहे. मा. शरद पवार साहेबांनी कापड उद्योगाप्रमाणे साखर उद्योगाची अवस्था होण्याचा धोक्याचा इशारा दिला आहे. मी सहकारी साखर उद्योगात राज्य व देश पातळीवर ३ दशके जबाबदारीच्या जागेवर काम केल्यामुळे भारत सरकार व साखर कारखाने ह्यांच्यामधील न्यायालयीन लढ्यामुळे साखर उद्योगाचा बट्ट्याबोळ (ग्रामीण भाषेत चोंबाळे) होत आहे, हे मी प्रत्यक्ष पहात आहे. मी माझे विचार नम्रपणे मांडून सर्व आर्थिक पार्श्वभूमीचा विचार करून ह्या प्रकरणात ऊस शेतकरी, साखर कारखानदार, सरकार ह्यांनी राजकीय विचार बाजूला ठेवून साखर उद्योग, शेतकरी व ग्राहक ह्यांच्या हितासाठी त्वरित सहमती करून त्याची समंजसपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन करू इच्छितो. कापड उद्योग दुसरीकडे जाऊ शकतो. साखर कारखान्याची नाळ ऊसमळ्यांशी घट्ट जोडलेली आहे. पार्श्वभूमी– साखर ही जीवनावश्यक वस्तू असल्याने ऊस उत्पादक व ग्राहक ह्यांच्या हितासाठी भारत सरकारने उसाची किमान किंमत, लेव्ही साखरेचा कोटा व किंमत (उसाचा किमान भाव + साखर प्रक्रिया खर्च + गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा – टॅरिफ कमिशन! बी.आय.सी.पी. शिफारशीप्रमाणे) ठरवून सार्वजनिक वितरणासाठी साखर कारखान्यांकडून सक्तीने साखर घेते व ग्राहकांची किमान गरज भागण्याची व्यवस्था करते. १९६७–६८ मध्ये भारत सरकारच्या असे लक्षात आले की, उसाचे वैधानिक किमान भाव ऊस उत्पादकाला परवडणारे नाहीत. त्यांना परवडणारे भाव दिल्यास ग्राहकाची किमान गरज भागण्यासाठी वाजवी दराचे गणित बसत नाही. त्यापेक्षा शेतकऱ्यांना किमानपेक्षा जास्ती दर मिळाल्यास ऊस व साखर उत्पादन वाढेल व त्यामधून सार्वजनिक वितरणाची साखर कारखान्यांकडून घेऊन बाकीची साखर खुल्या विक्रीस परवानगी द्यायची. भारत सरकारचे शेती मंत्री मा. रफी अहमद किडवाई ह्यांच्या अंशतः विनियंत्रणाच्या १९६७–६८ मधील धोरणाची पुढील काळातील यशस्वीता ही किदवई साहेबांच्या कामाची पावती आहे. ह्या धोरणाचे चांगले परिणाम दिसत असताना देशातील यमुना नगर, पानिपत, मलप्रभा अशा काही साखर कारखान्यांनी लेव्ही साखरेचे दर वाढवून मिळण्याबद्दल न्यायालयात दावे केले. सुप्रीम कोर्टात ती केस आली. भारत सरकारने असे दाखवून दिले की साखर कारखान्यांना खुल्या साखरेच्या विक्रीतून चांगले दर मिळाले आहेत व लेव्ही साखरेच्या पुरवठ्यातील (तथाकथित) तोटा भरून निघाला आहे. सुप्रीम कोर्टाने साखर कारखान्यांचे दावे फेटाळले.

हे प्रकरण इथेच थांबले असते तर बरे झाले असते. पण भारत सरकारच्या सुपीक डोक्यात एक भन्नाट कल्पना आली. त्यांनी साखरेच्या उत्पादन खर्चासंबंधी एक नवीन गणित मांडले. त्यामध्ये किमान वैधानिक ऊस दराऐवजी प्रत्यक्ष दिलेला ऊस दर घेतला. त्यामध्ये कारखान्यातील एकूण प्रक्रिया खर्च + गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा मिळवून एक पोत्याचा (१०० किलो) उत्पादन खर्च काढला. ह्यामधील ३० किलो खुल्या साखरेचा अंदाजे येणारा दर वजा केला व उरलेली रक्कम (७० किलो) लेव्ही साखरेची किंमत जाहीर केली. देशात दक्षिण बिहारमध्ये लेव्ही साखरेचा दर पोत्याला ४४१ रु. तर आंध्रमध्ये लेव्ही दर ११७रु. झाला. देशभर हलकल्लोळ माजला. हे कायद्याला धरून नाही व अप्रत्यक्षरीत्या १०० टक्के नियंत्रण आहे, ह्या मुख्य मुद्द्यांवर देशातील साखर कारखान्यांनी हायकोर्टात दावे केले. १९७४–७५चे धोरण १९७८–७९ पर्यंत चालू राहिल्याने साखर कारखान्यांचे हजारो दावे दाखल झाले. हायकोर्टानी दरातील फरक व एक्साईज ड्यूटीतील फरक ह्याबाबत साखर कारखान्यांकडून बँक गॅरंट्या घेऊन केंद्र सरकारने संरक्षण केले व कारखान्यांना अंतरिम भाववाढ दिली. सुप्रीम कोर्टात ह्यावर निकालास प्रदीर्घ विलंब लागला. गॅरंट्यांच्या कटकटीला कारखाने कंटाळले. मा. वसंतदादांबरोबर मा. भालचंद्र देशमुख साहेब कॅबिनेट सेक्रेटरीना तडजोडीसाठी भेटण्यास मी गेलो. दादांनी देशमुखसाहेबांना सांगितले, आमची

कायदेशीर बाजू भक्कम आहे. पण तडजोड म्हणून हायकोर्टाने अंतरिम वाढ दिली आहे. आपण इथेच थांबू. भारत सरकारने ही वाढ मंजूर करून प्रकरण मिटवावे. भारत सरकारला हे मान्य झाले नाही. पुढे मा. शरदराव पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली मा. पंतप्रधान नरसिंहराव साहेबांना शिष्टमंडळ भेटले. पवार साहेबांनी सांगितल्यावरून मी तडजोडीचे प्रपोजल तयार केले. मला हे माहीत होते की भारत सरकारने १९७४-७५ मध्ये लेव्ही साखरेचे भाव काढण्याची पद्धत बदलली तरी एका वेगळ्या कायदेशीर जबाबदारीसाठी जुन्या पद्धतीनेही लेव्ही साखर भाव काढून जाहीर करत असे. हेच भाव आमचे तडजोडीचे प्रपोजल म्हणून (मी मा. फली नरीमनकडून तपासून घेतले.) मा. शरदरावांनी मा. नरसिंहरावांना सादर केले. मा. पंतप्रधानांनी सांगितले, शरदराव पार्लमेंटमध्ये माझ्यासमोर जॉर्ज फर्नांडिस बसला आहे. तो म्हणेल मी साखर उद्योगाबरोबर डील केले आहे. ते मला नको. तुम्ही कोर्टातून निकाल घ्या. १९९३ मध्ये सुप्रीम कोर्टाने ह्या मलप्रभा (?) प्रकरणात निकाल साखर कारखान्यांच्या बाजूने दिला. भारत सरकारने १९७४-७५ ते १९७८-७९ हंगामासाठी लेव्ही साखरेचे दर ठरविले. जवळजवळ १०० टक्के कारखान्यांनी ते मान्य केले. (लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की हे दर मा. शरदरावांनी दिलेल्या प्रपोजलशी १०० टक्के जुळत होते.) कारखान्यांना हजारो कोटी रु. फरकाचे मिळाले.

उत्तर प्रदेश, बिहारमधील एक हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या कारखान्यांनी लेव्ही साखरेच्या दरासाठी सुप्रीम कोर्टात धाव घेतली तेव्हा लक्षात आले की सुप्रीम कोर्टाच्या निर्णयात काही चूक राहिली की काय? कुणीच हे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही. पण २००८ मध्ये महालक्ष्मी ह्या बिहारमधील साखर कारखाना प्रकरणी सुप्रीम कोर्टाने १९९३ चा निर्णय बदलला. (त्यांच्या मते तो १९९३ चाच निर्णय पाळत आहेत!) भारत सरकारचे शेतीखाते बॉम्बस्फोटासारखे हादरले (शेतीमंत्री मा. पवार साहेब) प्रथम किमान ऊस दराऐवजी लेव्ही साखरेसाठी फेअर अँड रेग्युनरेटिव्ह प्राईस हा बेस स्वीकारला व तो पूर्वलक्ष्यी म्हणजे १९७४-७५ पासून ३४-३५ वर्षे मागेपासून लागू केला. हा FRP दर किमान वैधानिक दरापेक्षा जास्ती होता. ह्यामध्ये खुल्या साखरेला मिळणाऱ्या दराचा विचार अंतर्भूत होता. व शेतकऱ्यांच्या आणखी काही खर्चाचा समावेश होता.

आज FRP च्या २००९ पासूनच्या वाटचालीकडे पाहिले असता किमान ऊस दराचे भूत (?) गाडण्यासाठी उभा केलेला FRP रोगापेक्षा औषध भयंकर तर नाहीना असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली.

माझा अभ्यास - FRP काळातील साखर धंद्याच्या वाटचालीची (२००९-१० ते २०१८-१९) ह्या १० वर्षांच्या कालावधीची मी माझ्या ३० वर्षांच्या आकडेवारीच्या अभ्यासात १९९०-९१ ते २००८-९ हा कालावधी व २००९ - १० ते २०१८-१९ असे २ भाग तुलनात्मक अभ्यासासाठी आकडेवारी मांडून तपासली. ही अधिकृत आहे. पहिला कालावधी १९९०-९१ ते २००८-९ ह्याच्या सुरुवातीला साखर उत्पादनात कार्यरत कारखान्यांची संख्या ३८५ वरून ४८९ वर गेली (उदारमतवादी धोरणाने सहकारी साखर कारखानदारीची पीछेहाट झाली) दररोजची ऊस गाळप क्षमता प्रत्येक कारखान्याची सरासरी २०८८ मे. टनावरून ३७१८ मे. टनावर, म्हणजे जवळजवळ दुप्पट गेली उसाचे गाळप १२ कोटी २३ लाख टनावरून १४ कोटी ५० लाख टनावर गेले. साखर उत्पादन १२० लाख मे. टनावरून १४५ लाख टनांवर गेले. (२१ टक्के वाढ) साखरेचा खप दरमाणशी दरसाल १२.७ किलोवरून १९.९ किलोवर गेला. (५७ टक्के वाढ) साखर धंद्याची ही प्रगती प्रशंसनीय होती.

आता ह्यासमोर FRP कालावधीतील प्रगती पाहू. उत्पादनातील कारखान्यांची संख्या ४८९ वरून ५२५ वर गेली. दररोजची सरासरी ऊस गाळप क्षमता ३७१८ वरून ४४३९ मे. टनावर गेली. ऊस गाळप १८.५५ कोटी मे. टनावरून ३२३ लाख टनांवर गेले. (७१ टक्के वाढ) पण दरमाणशी दरसाल साखरेचा खप १८.२ किलोवरून १९.३ इतका म्हणजे फक्त ६ टक्के वाढला.

थोडक्यात, किमान ऊस दराचा पाया अमलात असलेल्या काळात (१९९०-९१ ते २००-०९) साखर उत्पादन २१ टक्के वाढले व दरमाणशी साखरेचा खप ५७ टक्के वाढला तर FRPच्या काळात (२००९-१० ते २०१८-१९) ह्या काळात साखर उत्पादन ७१ टक्के वाढले व साखरेचा दरमाणशी खप फक्त ६ टक्क्यांनी वाढला. FRP मुळे ऊस उत्पादन व साखर उत्पादन वाढले पण साखरेचा खप फारच कमी दराने वाढला. परिणामी साखरेचे दर कोसळून ते साखर उत्पादनाच्या खर्चापेक्षा कमी झाल्याने साखर कारखाने तोट्यात गेले. साखरेच्या स्टॉकमध्ये वाढ होऊन व्याज व दर्जा सांभाळण्याचा खर्च वाढला. पगार, मशिनरी दुरुस्ती, आधुनिकीकरण सर्वांवर प्रतिकूल परिणाम झाला. साखरेच्या दरमाणशी खपात उत्पादनाच्या वाढीपेक्षा खूप कमी दराने वाढ होणे ह्याचा शास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे १) मधुमेहींची संख्या वाढत आहे का? २) साखरेचे दर सर्वसामान्य माणसाला न परवडणारे आहेत का? ३) सामान्यांची आर्थिक पातळी खरोखर उंचावली आहे काय? ४) मुबलक साखर उत्पादन असताना व शहरीकरणाचा वाढता वेग असताना साखरेच्या खपात म्हणावी तशी वाढ का नाही? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. एका लहान प्रमाणावरील तेही विहिरीवरील - ऊस उत्पादकाशी प्रस्तुत

लेखक संबंधित असल्याने ऊस दरवाढ हवीच आहे. कारण उसाची लागवड नफ्यासाठी केली जात नसून एकूण आतबट्ट्याच्या शेतीची तूट भरून काढायचा प्रयत्न असतो. आज आपण उसाला पर्यायी पीक देऊ शकलेलो नाही. भाजीपाला, कांदे-बटाटे इतकेच काय फळबागात सपाटून मार खाल्ल्याने शेतकऱ्याला ऊस पिकाचा आधार वाटतो.

ह्या प्रश्नांचा विचार करताना पुढील काही गोष्टी अवश्य विचारात घ्याव्या लागतील.

१) उसाची किंमत म्हणजे त्यातील साखरेची व जोड उत्पादनाची निव्वळ किंमत हे जगभर मान्य झालेले तत्त्व आहे. ऑस्ट्रेलियात ऊस उत्पादकाला उसाचा दर माहीत नसतो. माझ्या साखरेला इतके पैसे कारखान्याने दिले म्हणतो. ऑस्ट्रेलिया कार्यक्षमतेत जगात पहिल्या क्रमांकावर आहे.

२) किमान ऊस दर रेशनिंगवरच्या साखरेसाठी पायाभूत होता. तो पाया FRP वर बदलला मात्र लेव्ही साखर जनतेच्या आहारातून गायब झाली.

३) जोड उत्पादनावर हल्ली भर दिला जात आहे. ते योग्यच आहे. पण साखर उत्पादन हा मुख्य आधार आहे. साखर कारखानदारी मजबूत पायावर उभी असली पाहिजे कारण ती केवळ आजच्या पिढीची नव्हे तर भावी पिढीचाही वारसा आहे. कारखाना नसेल तर उसाची किंमत शून्य.

४) साखरेला मिळालेल्या दराप्रमाणे उसाची किंमत ही महाराष्ट्राच्या यशस्वी सहकारी साखर कारखानदारीची गुरुकिल्ली आहे.

५) महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाने २०१८-१९ हंगामासाठी ५६ कारखान्यांचा अभ्यास केला होता. त्यात त्यांचा स्वनिधी : कर्ज रेशिओ धोक्याच्या पातळीवर असल्याचे निदर्शनास आले होते.

६) मा. नितिन गडकरी साहेब केंद्रीय मंत्री, ह्यांनी नवीन साखर कारखान्याला परवानगी नको असे विधान केले आहे.

७) उत्तर प्रदेशात गूळ करण्याऐवजी साखर कारखान्याला येणाऱ्या उसाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होत असल्याने देशात साखर उत्पादनात वाढ होत आहे.

८) साखर ४ महिन्यात उत्पादन केली जाते - पूर्वी १३-१४ महिने खाल्ली जायची. आता २ वर्षांच्यावर पुरते.

९) उसाचे पेमेंटसाठी ३ हफ्ते असावेत.

१०) भारत सरकारला २००८-०९ मध्ये FRPचा निर्णय घ्यावा लागला. त्या सुप्रीम कोर्टाच्या १९९३ व २००८ निर्णयावर परत नजर टाका.

♦

---

# समाज...

**बा**ळासाहेब हाक कानी आली, मी चमकून मागे पाहिले, तोच 'तो' दिसला, विनायक, माझा शाळकरी मित्र. मोठा साहेब झालास, कशाला ओळख देशील? त्याच्या टिपिकल बायकी आवाजात आणि बायकी हावभाव करत त्याने विचारले, मी मात्र त्याला टाळू पहात होतो, 'नाही रे जरा गडबडीत आहे, नंतर भेटतो', असे म्हणून मी सटकणार तोच आग्रहाने त्याने मला थांबविले, चल चहा घेऊ म्हणत बळेबळेच जवळच्या हॉटेलात नेले. मी असा म्हणून मला टाळतो आहेस मला माहीत आहे, पण तूच माझं ऐकशील असा विश्वास आहे, मग ऐक तर.

शाळेत मला सर्वजण उत्तम म्हणून चिडवत पण तू एकटाच विनायक, विन्याही म्हणायचास, माझे बायकी हावभाव, आवाज आणि जाड भिंगांचा चष्मा म्हणून उत्तम म्हणायचे, उत्तम म्हणजे तो किंवा ती नाहीच, चक्क छक्का असा त्याचा अर्थ, मी खूप प्रयत्न केला, पण नाही बदललो आणि आता तेच माझे पोटापाण्याचे साधन आहे, 'म्हणजे तुझे आईबाबा नाहीत', 'नाही केव्हाच गेले. मला चाळीतूनही हाकलून दिले, मी तुझ्याप्रमाणेच शिकलो पण मला कुठेच नोकरी मिळाली नाही. मग मीच त्यांच्यात जाऊन राहिलो, टाळ्या वाजवून पैसै कमावू लागलो, त्यांनीच मला माणुसकी दाखवली, आता हेच शेवटपर्यंत करणार. तूच मला समजून घे आणि निदान टाळू तरी नकोस, ऐकशील ना, बोलशील ना माझ्याशी, आपल्या जुन्या आठवणी, शाळा, मित्र, सांगशील ना काहीतरी?'

मी मात्र सारखे घड्याळ बघत होतो, 'हो हो नक्की भेटू, मला ऑफिसला उशीर होतोय', असे घाईत बोलतच मी निघालो.

मी पुन्हा त्याला भेटेन का, बोलेन का मला काहीच माहीत नाही. मी घाईघाईनेच माझ्या सोकॉल्ड जगात परतू लागलो, त्याच्याशी बोलताना, चहा पिताना कोणी पाहिले तर नाही ना हीच चिंता मला सतावीत होती.

मागे वळून पाहिले तर तो पुन्हा टाळ्या वाजवीत निघाला होता आणि मी माझ्या मध्यमवर्गीय सुरक्षित जगात परतत होतो.

**लेखक- श्री. सुधाकर मराठे, पुणे**

# Career or job seeking

• श्री. परिमल मराठे (पृ. ३४१), औरंगाबाद, मुंबई भ्रमणध्वनी : ८९७५५६७५७४

Career or professional is something different than the jobseekers. If we go through the exact meaning of career it is an occupation undertaken for a significant period of a person's life and with opportunities for Progress. There is always confusion between job seeking and career building. Job seeking is temporary and it is more related with earning from our daily



efforts for something. Career is more and more personalised and related to our own life, progress, satisfaction and happiness.

In my opinion these both things goes hand by hand in initial stages. For freshers it is very essential to get job first to start with career planning. Career is long term process and job seeking is short term aim or necessity for present. But career building can be continued while doing job also. For proper career building one must be very choosy and select his area of working of career aims where he feels ease of working happiness and satisfaction.

For job seeking it is just like a project, you can achieve your goals or scope by seeking some required skills by employers. When we are thinking of job it is always about specific requirements from employers and skills and outputs are also fixed by organisations or employers. But when we talk or think about career scope and goals are different achievements, goals and satisfaction of applying knowledge is more important than tangible gains or earning money. Most of the time we are mixing both of these and loading our happiness and satisfaction. Job may be a tool of earning money for day to day needs but career biking and achievements are something different than job goals.

Career and job seeking is to be done simultaneously but both the goals should be kept separate and ultimate goal should career goal achievement and not job seeking. Job seeking or job is tool for career achievements. ♦

---

# Review of above article by Sneha Kasture Marathe

Nice article ...No doubt job seeking in early stages is necessary but when we talk about career building in my opinion one must have minimum 5 yrs of industrial experience.

When we talk about career building it is a very vast and satisfactory process. It gives immense satisfaction when we share our knowledge with others. But again it is not only about sharing but also a lifetime learning process. One must understand there is something to be learn from everyone you come across. If someone wants to build his/ her career he / she should have large perspective towards life then only he/ she will get satisfaction about their career. See those were the days when teachers shared their knowledge without thinking of money and society has a great respect for these people but now a days living is changed with change in lifestyle and economy. So one must think about earnings too. But at the same time make sure one must focus on the career building and not only on money oriented practices. ♦

# पंचांग - पारंपारिक विज्ञान

• नंदकुमार मराठे (पृ. २१९), कोल्हापूर भ्रमणध्वनी : ९९६०६३६०४०

**पं**चांग भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक होय. प्रत्येक भारतीय माणसाला जन्माला आलेल्या वेळेपासून मृत्यू घटकेपर्यंत पंचांगाशी या ना त्या कारणपरत्वे संबंधित असावे लागतेच. इतके जरी सत्य असले तरी पंचांग हा तसा क्लिष्ट आणि काहीसा अवघड विषय परंतु त्यामुळे सर्वसामान्य माणूस या वाटेला जाण्याचा प्रयत्न करीत नाही. किंबहुना त्यामुळे तो या विषयात अज्ञानी राहतो. त्यामुळे पंचांग म्हणजे नेमके काय, त्यापासून उपलब्ध होणारी माहिती व देश-विदेशी दृष्टिकोनातून त्याचे महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे. पंचांग, जिल्हा, गाव, देश, प्रांत सोडून परदेशातही उपलब्ध झाले आहे. पंचांगाची मूळ परिभाषा संस्कृत असल्याने ज्यांना देवनागरी भाषा समजते, अशा सर्व परदेशस्थ भारतीयांकडूनही पंचांगाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ज्योतिष गणितशास्त्रांचा उपयोग करून पंचांग तयार केले जाते. तिथी, वार, नक्षत्रे, योग, करण ही पंचांगाची पाच अंगे कालगणन व कालनिर्देश हे पंचांगाचे प्रमुख कार्य आहे. सूर्यचंद्रादी ग्रहांच्या गतीमुळे काळाची पाच अंगे तयार होऊन पंचांग तयार होते.

भारतीय पंचांगात सर्वसाधारणपणे चैत्र शुद्ध (गुढीपाडवा) प्रतिपदा या दिवसाने सुरुवात होते. त्यादिवशी घरोघरी गुढ्या-तोरणे उभी करून आनंदोत्सव साजरा करतात. सरासरी शालिवाहन राजाचे शक प्रमाण मानतात. तथापि, सर्व भारतीय शालिवाहन शक मानतात असे नाही. परंतु त्याशिवाय महावीर संवत्, विक्रम संवत्, इसवी सन, हिजरी सन, पारशी सन, शिव शक असा वेगवेगळ्या संवत्सरांना भागही प्रमाण मानतात.

सर्व पंचांगांवर सामान्यपणे मुखपृष्ठावर दिसणारी पहिली संख्या ५०८८ ही संख्या कलियुग शकाची (युगाब्दाची) शक, संवत्, सन, अब्द, संवत्सर हे विविध वर्षांच्या कालावधीची गणना करण्यासाठी वापरले आहेत. भारतीय कालगणनेत किंवा इतिहासात प्राचीन काळाशी अखंड नाते जोडणारे आणि आजतागायत वापरात असलेले कलियुग शक द्वापारयुगाच्या शेवटी झालेल्या महाभारत युद्धानंतर ३६ वर्षांनी भगवान श्रीकृष्ण अंतर्धान पावल्यानंतर सुरू झाले, ते वर्ष होय - शालिवाहन शक पूर्व ३१८०.

कलियुगात एकूण ६ शककर्ते झाले. पहिला युधिष्ठीर इंद्रप्रस्थान झाला. त्याचा शक ३०४४ वर्षे राहिला, असे इतिहास सांगतो. इतिहासाचा मागोवा आणि प्रख्यात ज्योतिषी वराह मिहिर यांच्या मते युधिष्ठीर शक इ.स. पूर्व २४२९ या वर्षी झाला. म्हणजे ३०४४ मधून २४२९ वजा केल्यास ५९५ हे इसवी सनाचे वर्ष युधिष्ठीर शक समाप्तीचे.

**१. महावीर संवत -**

त्यानंतर सर्वात जुना महावीर संवत इ.स. ५२६ या वर्षी कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून (महावीर निर्वाण दिनापासून) सुरुवात.

**२. विक्रम संवत -**

उज्जैनीच्या विक्रमादित्य राजाने इ.स. पूर्व ५६व्या वर्षी सुरू केला.

**३. इसवी सन -**

ख्रिस्ती लोकांच्या सुरुवातीस ज्युलियन कॅलेंडर प्रचारात होते. परंतु त्यामध्ये काहीसा फरक येऊ लागल्याने पोप ग्रेगरीने कॅलेंडर सुरू केले. १६ व्या शतकात याचा प्रारंभ झाला. ग्रेगरीन पद्धती सर्व जगमान्य झाली.

**४. शालिवाहन शक -**

शालिवाहन राजाने आपल्या राज्याभिषेकाच्या स्मृती ख्रिस्तवध - ३ मार्च, ७८ या दिवशी शालिवाहन शक सुरू केला.

गोदावरी तीरावर पैठण क्षेत्री शालिवाहन नावाच्या राजाने पूर्वीचा शक काळ आपल्या नावाने सुरू केला. पहिल्या शतकात महाराष्ट्र प्रांतातील राजा पलुमाची सातकर्णी याने आपल्या नावे शालिवाहन शक सुरू केले. १ला शककर्ता राजा धर्मराज, दुसरा उज्जैनीचा विक्रम, तिसरा पैठणचा राजा शालिवाहन, ४था सिंधू देशाचा राजा विजयाभिनंद, ५ वा धारातीर्थीचा राजा नागार्जुन व ६ वा रायगडचा राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना शककर्ते म्हणून ओळखले जाते. सन व शालिवाहन शक यामध्ये ७८ वर्षांचा फरक आहे. १९१५ ला शालिवाहन शक सुरू झाले आहे. संवत व शक वर्ष यात १३५ वर्षांचा फरक आहे. सध्या विक्रम संवत २०५० सुरू आहे.

**५. हिजरी सन -**

हा मूळचा अरबस्तानातील. महंमद पैगंबर, १५ जुलै, ६२२ ला मक्केहून मदिनेस गेले तेव्हापासून या सनाची सुरुवात हिजरी

आणि जलाली कालगणना राजकी पत्रव्यवहार पूर्वी आढळून येते.

**६. पारशी सन–**

हा इराणात इ.स. ६२० या वर्षी सुरू झाला. हा सन सुरू झाल्यावर ४२ वर्षांनी पर्शियातून हे लोक हिंदुस्थानात आले.

**७. शिव शक –**

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शके १७९६ आनंद संवत्सर या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी हा शक सुरू केला. कारण त्याच दिवशी त्यांना राज्याभिषेक झाला.

भारतीय पंचांगाची सुरुवात चैत्र शुद्ध प्रतिपदेला होते. महाराष्ट्रात एकूण १८ पंचांगे प्रसिद्ध होतात. पंचांगांचा कालावधी निर्मितीचा काळ ३००० वर्षांपूर्वीचा आहे. कौन्सिल ऑफ सायंटिफीक ॲन्ड इंडस्ट्रियल रिसर्च विभागाने डॉ. मेघानंद सहा यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील सर्व राज्यांतील पंचांगांच्या एकवाक्यतेसाठी एक समिती निर्माण केली होती. आर्यभट्ट ब्रह्मगुप्त भास्कराचार्य हे ज्योतिषशास्त्राचे तत्कालीन काळी गाढे व्यासंगी होते.

अशा तऱ्हेने विविध कालातील आधारावर सुरू झालेली पंचांगाची मांडणी व ग्रहरचना वेगळी असली तरी त्यामध्ये एकवाक्यताही आढळते. इसवी सनापूर्वी १५०० च्या सुमारास तिथी व नक्षत्रे अशी दोनच अंगे होती. कालांतराने वार, करण ही अंगे समाविष्ट झाली. योग हे अंग, इ.स. ७ व्या शतकात समाविष्ट झाले.

भविष्य वर्तवणारी जगात शेकडो पंचांगे असून किमान बऱ्याच पंचांगात याबाबत एकवाक्यता आढळते. प्रत्येक सणामध्ये टिळक पंचांगात ४–५ दिवसांचा फरक आढळतो. १९०६ साली या विषयावर सांगोपांग चर्चा व्हावी म्हणून मुंबईत एक **'ज्योतिष परिषद – पंचांग संमेलन'** ही भरविण्यात आले होते. महाराष्ट्रातील एकूण १० पंचांगांमध्ये फक्त टिळक पंचांगाचा अपवाद असल्याने टिळकांचे पंचांग हे स्थूलमानाने निर्देशक नसावे, असाही निर्णय झाला. या निर्णयाबाबत जाणकारांची मतमतांतरे आहेत. आकाशात दिसणाऱ्या ग्रहताऱ्यांच्या सूक्ष्म अभ्यासाने पंचांग तयार करावे, असेही या परिषदेत ठरले. पंचांगाचा अभ्यास, प्रचारपूर्व अभ्यासिका, प्रशिक्षण, गरज, महत्त्व आणि उपयोग याचा अभ्यास करण्यासाठी १९६० साली नाशिक येथे पंचांग संमेलन भरविण्यात आले. त्यामध्ये पंचांगाच्या अभ्यासाचा शालेय शिक्षणात अंतर्भाव करावा, असा ठराव करण्यात आला. मानवी जीवन सुसह्य आणि सुखकर व्हावे या मूळ पायावरच पंचांगाची उभारणी व्हावी, असे ठरले. महाराष्ट्रात, सोलापूरकर दाते यांचे पंचांग, नागपूरचे राजेंदेकर यांचे 'महाराष्ट्रीयन व वैदर्भीय पंचांग', कराडचे 'रूईकर पंचांग', पारनेरकर महाराज यांचे 'शास्त्रशुद्ध पंचांग', पुण्याचे 'टिळक पंचांग', मुंबईचे ढवळे 'बृहत पंचांग', साळगांवकरांचे 'कालनिर्णय पंचांग', कोल्हापूरचे 'लाटकर पंचांग', गुजराती भाषेतील 'जन्मभूमी पंचांग', अहमदाबादचे 'गुजराथी संदेश', हरदेव शास्त्री यांचे 'विश्वविजय पंचांग' व 'गजेंद्र विजय पंचांग', मारवाड येथील 'मारवाडी पंचांग' आणि 'भारतीय पंचांग' ही प्रामुख्याने प्रत्यक्ष आहेत. शिवाय 'भारतीय पंचांग' व 'निर्णयसागर' इ. पंचांगे प्रत्यक्ष आहेत. गुजराथ पंचांगाचा आरंभ कार्तिक प्रतिपदेकडून बाकी पंचांगांचा प्रारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून होतो.

पंचांगात प्रामुख्याने संवत्सर, ऋतू, मास, पक्ष, तिथी, वार, नक्षत्र, योग व करण यामध्ये अनुक्रमे ६० संवत्सरे, ६ ऋतू, १२ मास, २ पक्ष, १६ तिथी, ७ वार, २७ नक्षत्रे उत्तरायण आणि दक्षिणायन अशी दोन अंगे बसविलेली असतात. कर्क राशीला रवी गेल्यापासून रवी धनू राशीत असेपर्यंत दक्षिणायन व मकर राशीला रवी गेल्यापासून मिथून राशीत तो असेपर्यंत उत्तरायण असा कालावधी आढळतो. ६० संवत्सरांची मांडणी इ.स. १७६४ पासून 'सोमदैवज्ञ' नावाच्या ज्योतिषाने कल्पलता नावाच्या मेदिनीय ज्योतिषावर ग्रंथ लिहिला तेव्हापासून सुरू झाल्याचे इतिहास सांगतो. भगवान नारदमुनी यांची भार्या नारदीस ६० पुत्र झाले. त्यांच्या नावाची ही संवत्सरे असल्याचे पौराणिक उल्लेख आढळतात. १ ले संवत्सर प्रभव, शेवटचे संवत्सर क्षय. याशिवाय १२ पारशी महिने, १२ मुसलमानी, १२ फसली, १२ इंग्रजी महिने आहेत.

आयुर्वेद आणि पंचांग यांचा परस्परसंबंध आहे. आजतागायतच्या पंचांग संशोधनावरून त्यांची प्राचीनता निश्चित सिद्ध झाली आहे. सूर्य आणि चंद्र हे मन आहे, असे वेदांतात सांगितले आहे. याशिवाय आकाशातील ग्रह हे आपण पाहतो. ते दर दोन मिनिटाला पुढे सरकत असतात. नक्षत्रापासून मिळणारा प्रकाश जो ग्रहण करतो, त्याला ग्रह म्हणून संबोधतात.

फक्त भारतीयांना पंचांगाचा आधार घ्यावा लागतो. २१ व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या देशाला आकाशातील चंद्र, सूर्य, तारे याबाबतचे अंदाज, स्थूलमानाने होत असलेले बदल विचारात घेता एकूण वैज्ञानिक प्रगती लक्षात घेता या पंचांगावर असणारे ज्योतिषशास्त्र काहीसे मागे पडते का? अशी एक सुप्त भीती व्यक्त केली जाते. पंचांगाचे गणितशास्त्र आजतागायत खरे ठरले असून कालचक्रामध्ये फरक पडला नाही, असे आजतागायत घडले नाही. हा पंचांगशास्त्राचा विजय आहे. चैत्र ते फाल्गुन या बारा महिन्यांच्या कालावधीस 'शक' म्हणतात. १६४२ सालच्या

प्राचीन पंचांगाची प्रत धुळे येथे राजवाडे संशोधन मंदिरात आढळते. सदरचे पंचांग हस्तलिखित स्वरूपात आढळते.

पंचांगाची मूळ कल्पना वेदात आहे. तारे, देवता यांचे वर्णन त्रैतिरीय ब्राह्मण ग्रंथात आढळते. त्यामुळे पंचांगाची प्राचीनता सिद्ध होते. ती एक भारतीय कला आहे. प्राचीन काळी पंचांगात घटिकेत वेळ नमूद करीत असत. परंतु दिवसेंदिवस पंचांगात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन नवनवीन सुधारणा केल्या आहेत. त्यामुळे घटिकेबरोबर स्टँडर्ड टाइम, दिवस, नक्षत्र, योग, स्थिती, राशी भविष्य, मुहूर्त, शुभयोग इत्यादीपासून अगदी पंचांग कसे पहावे यांची नोंद विद्यमान पंचांगात वाढविली आहे. त्यामुळे हे पंचांग सामान्यजनांचे होकायंत्र बनले आहे.

जगाच्या पाठीवर अमेरिका व इंग्लंड देशाचे पंचांगाला आवश्यक असणारी एक पुस्तिकाही तयार केली आहे. त्यामुळे समुद्रातील खलाशी, आकाशातील वैज्ञानिक यांना वातावरणातील बदल, धोके, पाऊस, पर्जन्यमान, वेधशाळा यांनाही अचूक माहिती पंचांगाने मिळते. देशातील आकाशवाणी, दूरदर्शनही पंचांगाचा उपयोग करतात. त्याचबरोबर विविध पंचांगकर्ते ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात. त्यामुळे पंचांग भारतीयांचा अमोल ठेवा आहे. ♦

---

# आवाहन

पुढील २०२२ हे वर्ष किरात साप्ताहिकाचे शताब्दी वर्ष असणार आहे. कै. अनंत वासुदेव मराठे यांनी किरात साप्ताहिकाची १९२२ साली सुरुवात केली. कै. केशव अनंत उर्फ बाबा मराठे. कै. श्रीधर केशव मराठे यांनी किरातची वाटचाल कालसुसंगत पद्धतीने सुरू ठेवली. श्रीधर मराठे यांनी 'दिवाळी अंकाची' परंपरा सुरू केली. साप्ताहिक किरातने दिवाळी अंकात नेहमीच ज्येष्ठ साहित्यिकांसोबत नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ दिले आहे.

'साप्ताहिक किरात' अविरत सुरू रहावा, यासाठी याचे प्रकाशन आता 'किरात ट्रस्ट'तर्फे केले जात आहे. २००८ पासून किरात रंगीत स्वरूपात नियमितपणे वाचकांच्या भेटीला येत आहे. www.kiratonline.com ही वेबसाईट आणि सोशल मिडियावरही किरात उपलब्ध आहे. किरात हे जगभरात स्थायिक असलेल्या वेंगुर्लेवासीयांचे मुखपत्र तर आहे. शिवाय कोकणचे सामाजिक, राजकीय प्रश्न मांडणारे निरपेक्ष साप्ताहिक ठरले आहे याचा आम्हाला अभिमान आहे. परिसरातील बातम्या देत असतानाच सर्वसमावेशक विकासाभिमुख भूमिकेला किरातने नेहमीच पाठिंबा दिला आहे. शताब्दी वर्षात आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही परंपरा अशीच यापुढेही सुरू ठेवणार आहोत.

यानिमित्ताने करण्यात येणाऱ्या विशेष अंकामध्ये किरातविषयी तसेच वेंगुर्ल्याविषयीच्या आपल्या आठवणीपर लेख, आपले अनुभव या संपादक किरात साप्ताहिक, खर्डेकर पथ, वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग पत्त्यावर अथवा युनिकोडमध्ये टाईप करून ई-मेलने kirattrust@gmail.com यावर पाठवावेत.

**टीप** – पाकिटावर किरात २०२२ शताब्दी विशेष अंका करीता असा उल्लेख करावा.

**सीमा मराठे**
संपादक किरात



**किरातची वर्गणी पाठवा, किरातचे सभासद व्हा!**

वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) ३००रु. आजीवन – ५०००रु. आपण ९६८९९०२३६७ या मोबाईलवर गुगल पे करून वर्गणी भरू शकता किंवा कोअर बँकिंगसाठी करंट अकाऊंट डिटेल्स.

Sarswat Bank, Vengurla Branch- A/c Name - Kirat Trust, A/c No. 039100100002386, IFSC Code - SRCB0000039

State Bank of India, Vengurla Branch, A/c Name - Kirat Trust. A/c No. 32434234291, IFSC Code - SBIN0000495

भरल्यानंतर कृपया कळवा – ०२३६६-२६२२१७, २६२४४५

## हसरे हितगुज



परवा बायको म्हणाली, 'दिवाळीच्या सुट्टीमध्ये आपण मालदीवला जाऊन येऊ'
मी म्हणालो, "आपण गेलो असतो गं, पण माझ्यामागे नसत्या चौकश्या सुरू होतील आणि तुलाही एखादी पत्रकार परिषद घ्यावी लागेल..."
तेव्हापासून बायको दिव्याला जायचे म्हटले तरी नको म्हणते!

# मराठी पत्रकारिता आणि पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे

• डॉ. सतीश तराळ, अमरावती भ्रमणध्वनी : ९८२२५७९५७५



मराठी पत्रकारितेला मराठी साहित्यासारखा जाज्वल्य इतिहास आहे. समृद्ध महानुभाव वाङ्मय, ज्ञानेश्वरी यामुळे साहित्याची सरिता उगमस्थळीच महासागराचे रूप धारण करते. आद्य वाङ्मयाची बरोबरी करणारे तुकारामाच्या गाथा ती सारखी फार कमी वाङ्मय उत्तर काळात आढळते. मराठी पत्रकारितेचेही काहीसे असेच आहे. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, खाडिलकर, सी.म. परांजपे आदी प्रज्ञावंत पत्रपंडितांनी मराठी पत्रकारिता समृद्ध केली. महात्मा गांधी त्यांच्या वृत्तपत्रातून हिंदी, इंग्रजी, गुजरातीमधून लिहीत असले तरी त्यांचे वास्तव्य विदर्भात सेवाग्रामला होते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव सर्व जगावर होता व आहे. तसा तो महाराष्ट्रावर व मराठी पत्रकारितेवरही होता. ही पत्रकार मंडळी आजच्यासारखी पत्रकारितेची पदवी, पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेली नव्हती. आजच्यासारखी त्याकाळात पत्रकारितेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड नव्हती. खिळे जोडून मजकूर छापण्याचा तो काळ होता. बातम्या पोस्टाने येत. फार महत्त्वाच्या असल्या तर तारेने किंवा फोनवर सांगितले जात. टेलिफोन ऑपरेटर टेलिफोन ऑफिसमधून फोन जोडून देत असे. फक्त लँडलाइन फोन होते. सुरुवातीच्या काळात तेही नव्हते. आज डी.टी.पी., स्मार्टफोन, संगणक यांच्यामुळे पत्रकारिता सुलभ गतिमान झाली आहे. पण पत्रकारितेचा दर्जा घसरला आहे. पूर्वी पत्रकारितेत ध्येयवाद होता. मूल्यभाव होता. व्यक्ती, समाज, देश घडविण्याचे एक प्रभावी साधन म्हणून पत्रकारिता होती. पारतंत्र्यात असताना स्वातंत्र्यलढ्याचं एक शस्त्र म्हणून वृत्तपत्रांकडे बघितलं जायचं. पत्रकारिता स्वातंत्र्य प्राप्तीचं आणि समाज जागृतीचं, समाजपरिवर्तनाचं अस्त्र होत. तेव्हा वृत्तपत्राकडे व्यवसाय म्हणून नाही तर एक व्रत म्हणून पाहिलं जायचं. आज वृत्तपत्र व्यवसायही राहिला नाही. तो एक धंदा झाला. बऱ्यावाईट मार्गानं अधिक नफा मिळवणारा! आज वृत्तपत्रातील कर्मचाऱ्यांना संपादक, उपसंपादकांना जाहिरातीचे, अंकविक्रीचे 'टारगेट' दिले जातात. पूर्वी असे नव्हते. पत्रमहर्षी स्वर्गीय बाळासाहेब मराठे हे मूल्यतत्त्व पत्रकारिता करणारे ध्येयवादी पत्रकार संपादक होते. आज पत्रकारितेच्या पदव्या घेऊन पत्रकार होतात. बाळासाहेबांसारख्या पत्र महर्षींनी जे कार्य केले त्यावरून पत्रकारितेचा अभ्यासक्रम, मूल्य ठरविली जातात.

मला पत्रकारितेची आवड आणि आकर्षण असल्यामुळे माझ्या वयाच्या १८ व्या वर्षापासून माझा बाळासाहेबांशी संबंध येत गेला. मी महाविद्यालयात शिकत असताना पाहिलेला पहिला संपादक म्हणजे बाळासाहेब! विश्वातील सर्वात महान व्यक्तिमत्त्व ठरलेला महात्मा गांधींच्या विचारांचा बाळासाहेबांवर मोठा प्रभाव होता. ते अंतर्बाह्य गांधीवादी होते. महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस हे त्यांचे आदर्श होते. यांच्या विचारातून त्यांची पत्रकारिता फुलली. महात्माजी तर विश्वविख्यात पत्रकार होते. कोणत्याही वृत्तपत्रात त्यांनी, कोणत्याही भाषेत काही लिहिले तरी ते जगभर पोचत असे. महात्माजी द. आफ्रिकेत असतानाही त्यांनी स्वतः वृत्तपत्राचे संपादन केले व भारतात आल्यावरही महात्माजींनी भारतीयच तर वैश्विक पत्रकारितेला धन्यवाद व मूल्यनिष्ठा दिली. महात्मा गांधी हे बाळासाहेबांचे आदर्श होते. स्वराज्य प्राप्ती, सुराज्य निर्मिती आणि समाजपरिवर्तन याबाबतीत महात्माजींनी जी दिशा आणि दृष्टी दिली त्यानुसार बाळासाहेबांनी स्वयःप्रज्ञेने बहुमोल कामगिरी केली. महात्मा गांधींशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला होता. महात्माजी अमरावतीत येत असत. 'महात्मा गांधी यांचे एकादशवत' यासारख्या विषयावर बाळासाहेब नेहमी व्याख्याने देत. बाळासाहेब प्रतिभावंत, प्रज्ञावान होते. तसेच हे उत्कृष्ट वक्ते होते. 'वक्ता दशसहस्त्रेषु' असे म्हटले जाते. ते या प्रकारातील वक्ते होते. डॉक्टर शिवाजीराव पटवर्धन, उपाख्य दाजीसाहेब महान तपस्वी, त्यागी, दानी होते. त्यांचा अभ्यास, चिंतन दांडगे होते.

बाळासाहेबांनाही ते आदरणीय पूजक होते. ते सुद्धा उत्तम वक्ते होते. पण बाळासाहेबांचे वक्तृत्व दाजीसाहेबांपेक्षा रसाळ होते. त्यांना ऐकणे म्हणजे एक मेजवानी असे. ते उत्कृष्ट वक्तृत्वाचा दुर्मीळ नमुना होते. भाषाप्रभुत्व व विचार सौंदर्य यामुळे त्यांचे भाषण चिरस्मरणीय व प्रेरणादायी ठरत असे. स्वातंत्र्यासाठी व सुराज्यासाठी त्यांनी आपल्या लेखणीप्रमाणेच वाणीही झिजवली. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रेरक आणि प्रभावी होते. चिंतनशीलता, ललित्य, प्रबोधन सामर्थ्य ही त्यांच्या लिहिण्या बोलण्याची वैशिष्ट्ये होती. ते केवळ उत्कृष्ट लेखक, वक्ते, पत्रकार, संपादकच नव्हते तर लेखक, वक्ते, पत्रकार, संपादक घडवणारे सृजनशील व प्रचंड संस्कार सामर्थ्य असणारे गुरुवर्य होते. त्यांच्या विचारांना आचाराची जोड होती. विचार आणि आचार यांचे अद्वैत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय वैशिष्ट्य होते. लोका सांगे ब्रह्मज्ञान... अशी त्यांची वागणूक नव्हती. वाणीद्वारे, लेखणीद्वारे ते जसे प्रबोधन करीत त्यांच्या वृत्तीद्वारे, आचारणाद्वारेही होत असे. त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान मोठं व महत्त्वाचे. तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे. पत्रकारिता हा त्यांचा छंद नव्हता तर त्यांचे ध्येय होते. त्यांचे ते समाजप्रबोधन व समाजपरिवर्तनाचे शस्त्र होते. पत्रकार संपादक म्हणून ते कोणत्याही पक्षाचे, गटाचे नव्हते. त्यांची भूमिका सदसद्‌विवेकबुद्धीवर आधारलेली तटस्थ होती. त्यांनी स्वतंत्र पत्रकारितेची मूल्ये जपलीच नाही तर पत्रकारितेत नवीन मूल्ये निर्माण केली. त्यांनी अनेक कार्यकर्ते, पत्रकार घडविले. बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पणपासून सुरू झालेली मराठी पत्रकारितेची उज्ज्वल परंपरा महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी विकसित होत गेली. अभिजन पत्रकारिता, बहुजन पत्रकारिता, हरिजन पत्रकारिता, गांधीवाद पत्रकारिता अशी वेगवेगळी बिरुदावली अभ्यासाची सोय म्हणून तिला मिळाली. वरील सर्व प्रकारच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये एकत्रितपणे बाळासाहेबांच्या पत्रकारितेत होती. जिथे जे चांगलं ते तिने स्वीकारले व आपली स्वतंत्र, स्वयंप्रज्ञेची नवीन वाट निर्माण केली. बाळासाहेबांची पत्रकारिता हा स्वतंत्र चिंतनाचा, संशोधनाचा विषय आहे. पत्रकारितेचे विद्यार्थी त्यांच्या लघुशोध निबंधात त्यांचा शोध घेतही असतात पण अजूनपर्यंत त्यांच्या पत्रकारितेवर खरे, दीर्घ, अभ्यासपूर्ण त्यांना न्याय देणारे संशोधन झाले नाही ही खंत आहे. पत्रकारितेत पीएचडी करणाऱ्याकडूनही अजून त्यांना योग्य न्याय मिळाला नाही. 'बिंबप्रतिबिंब' या त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित गौरवग्रंथातही त्यांच्या पत्रकारितेवर लेख असले तरी त्यांच्या पत्रकारितेचा सखोल, सर्वव्यापी विस्तृत आलेख नाही. अनेक लेख असणाऱ्या अशा ग्रंथात ते शक्यही नसते. बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्त्व व कार्याचे दर्शन मात्र या गौरवग्रंथात उत्तम आले आहे.

साने गुरुजी हे गांधीवादी पत्रकारितेचे एकमेव उत्कृष्ट उदाहरण आहे. गांधीजी आणि सानेगुरुजींच्या ध्येयवादी मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा बाळासाहेबांवर प्रभाव आहे पण त्याचे अनुकरण नाही. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर आणि डॉ. बाळासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये बाळासाहेबांच्या पत्रकारितेत आहेत. म्हणूनच आजही त्यांचे 'दैनिक हिंदुस्तान' समाजाच्या सर्व स्तरात, सर्व धर्मीयांमध्ये सर्व जाती, जमातीमध्ये वाचले जाते. बाळासाहेबांच्या पुढच्या पिढ्यांना त्यांच्या सारखे संपन्न व्यक्तिमत्त्व लाभले नसेल पण त्यांचा वसा आणि वारसा त्यांनी सामूहिकपणे, समर्थपणे जपला आहे. बाळासाहेबांनंतर हिंदुस्थान अमरावती व्यतिरिक्त इतर जिल्ह्यांत वाचकप्रिय ठरला आहे. स्व. अरुण दादा, श्री. उल्हासराव, श्री. विलासराव, श्री. विनोद राव, श्री. विवेक राव व सौ. मनीषाताई या सर्व मराठे परिवारांचे योगदान महत्त्वाचे आहे. टिळक आणि गांधी अनेकांना दोन टोके वाटतात. टिळक आणि आगरकर आधी एकाच वृत्तपत्रात एकाच प्रकारची पत्रकारिता करीत असत. पण त्यांच्यात आधी राजकीय की आधी सामाजिक हा वाद एवढा विकोपाला गेला की त्यांनी स्वतंत्रपणे वृत्तपत्रे संपादित केली. गांधी आणि आंबेडकर ही सुद्धा लोकांना दोन टोके वाटली. तशी ती नव्हती व नाहीत हे आता रावसाहेब कसवेसारखे विचारवंत मांडत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेवर गंगाधर पानतावणे यांनी मोठा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. तसा बाळासाहेब यांच्या पत्रकारितेवरही होऊ शकतो पण तो अजून झाला नाही. तसा मेहनती बुद्धिमान संशोधक बाळासाहेबांना अद्याप लाभला नाही. हिंदुस्थान प्रेसला लागलेली आग व त्यात जळून खाक झालेले हिंदुस्थानचे अंक हा त्यांच्या वरील संशोधनात मोठा व्यत्यय आहे. बाळासाहेब महात्मा गांधींचे अनुयायी होते. लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. सुभाषचंद्र बोस यांच्या क्रांतिकारी विचारांचीही त्यांची बांधिलकी महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेचा विचारही त्यांनी मनापासून अंगीकारला होता म्हणून त्यांची पत्रकारिता स्वतंत्र समन्वयवादी पत्रकारिता होती. सर्वांमधून त्यांनी उत्तमांगाचा स्वीकार केला होता. त्यांची स्वतःची स्वतंत्र विचार, आचारसरणी होती. ते स्वतः प्राज्ञ प्रतिभावंत होते. पूर्वसुरीचे संस्कार स्वीकारत त्यांच्या स्वयंप्रज्ञेतून त्यांची पत्रकारिता विकसित झाली होती. बाळासाहेबांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीला एक स्वतंत्र बाण्याची पत्रकारिता दिली. त्यांच्या हिंदुस्थानने मराठी वृत्तपत्रांमध्ये स्वतःचे एक स्वतंत्र स्थान निर्माण

केले. हिंदुस्थानला वगळून मराठी वृत्तपत्रांचा इतिहास लिहिला जाऊ शकत नाही. विदर्भ आणि अमरावती जिल्ह्यांच्या पत्रकारितेत तर हिंदुस्थानचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. १९२० साली टिळकांच्या ध्येयधोरणांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी बाळासाहेब खापर्डे यांनी उदय साप्ताहिक सुरू केले. पुढे ते अर्ध साप्ताहिक झाले. ५० वर्षांपेक्षा जास्त काळ हे वृत्तपत्र सुरू होते. ते एक महत्त्वाचे वृत्तपत्र होते. १९४७ साली सुरू झालेल्या साप्ताहिक हिंदुस्थानचे १९५० साली बाळासाहेबांनी दैनिकात रूपांतर केले व त्याचे मालक, संपादकही झाले. स्वातंत्र्याच्या उदयकाळी सुरू झालेले हे बाळासाहेबांचे वृत्तपत्र अमृतमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत आहे.

अ.भा. पत्रकार संघाच्या अधिवेशनाचे अध्यक्षपदही बाळासाहेबांनी भूषविले होते. हिंदुस्थानच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न मांडले. अनेक समस्या सोडवल्या. अमरावती जिल्ह्याच्या विकासात बाळासाहेबांचे व त्यांच्या दुसऱ्या, तिसऱ्या पिढीचे हिंदुस्थानचे योगदान महत्त्वाचे आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या अल्पवयीन देशभक्तांना कारावासाची शिक्षा झाली नाही आणि ज्यांनी कारावास भोगला त्यांनाच स्वातंत्र्य संग्राम सैनिक संबोधले गेले. त्यांनाच सवलती प्राप्त झाल्या. या अन्यायाला वाचा फोडून बाळासाहेबांना तत्कालीन अल्पवयीन स्वातंत्र्य संग्राम सैनिकांना न्याय मिळवून दिला. आज अमरावती शहरात व जिल्ह्यात अकोला व इतर जिल्ह्यांसारखा पाण्याचा दुष्काळ नाही. याचे श्रेय सुद्धा बाळासाहेबांना आहे. त्यांनी हिंदुस्थानमधून हिंदुस्थान परिवाराचे एक घटक असणाऱ्या बी.टी. देशमुख यांच्यामार्फत पाणी प्रश्न वर्षानुवर्षे मांडला म्हणून अमरावतीची पाणी समस्या सुटली. डोक्यावर घाण वाहून नेण्याच्या प्रथेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला व ती प्रथा बंद करण्यास भाग पाडले. भारताचे कृषिमंत्री राहिलेले शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. डॉ. पंजाबराव यांचे त्यांच्यावर विशेष प्रेम होते. अनेक बाबतीत त्यांनी बाळासाहेबांना मदत केली. तत्कालीन किंग एडवर्ड कॉलेज आजचे विदर्भ महाविद्यालय अमरावती येथे सुभाषचंद्र बोस यांचे भाषण आयोजित करणे व महाविद्यालयावर तिरंगा फडकवणे या आरोपांवरून बाळासाहेबांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले होते. महाविद्यालयीन जीवनापासून राष्ट्रप्रेमाची भावना त्यांच्यात प्रबळ होती. पुढे स्वातंत्र्याच्या संग्रामात त्यांना अनेकदा कारावासही भोगावा लागला.

विदर्भवीर जांबुवंतराव धोटे यांच्याशी बाळासाहेबांचे विशेष स्नेहसंबंध होते. त्यांच्या स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनाला बाळासाहेबांनी योग्य प्रसिद्धी दिली व अनिष्ट बाबींवर टीकाही केली. स्वातंत्र्यानंतर गांधीजींच्या इच्छेप्रमाणे कुष्ठकार्याला वाहून घेणाऱ्या डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्याशीही बाळासाहेबांचे ऋणानुबंध होते. कुष्ठ प्रश्नावर त्यांनी ललित साहित्याच्या माध्यमातूनही लेखन केले व कुष्ठरोग्यांच्या समस्या हिंदुस्थानमधून प्रभावीपणे मांडल्या. कुष्ठ समस्येवर त्यांनी 'प्राजक्ताच्या पाकळ्या' ही कादंबरी व एक नाटक लिहिले आहे. तपोवनच्या विकासात त्यांचा वाटाही महत्त्वाचा आहे. त्यांनी आपली प्रतिभा आणि पत्रकारिता सामाजिक परिवर्तनासाठी राबवली. त्यांची पत्रकारिता तत्त्वाधिष्ठित, सत्याधिष्ठित होती. अनेक नामवंत पत्रकार आपण बाळासाहेबांमुळे घडण्याची कबुली देतात. माजी मंत्री ॲड. यशवंतराव शेरेकर म्हणतात, ''स्व. बाळासाहेबांच्या कृतीमुळे व आशीर्वादाने मी आमदार झालो व त्यानंतर मंत्री होऊ शकलो.'' विदर्भात कृषी विद्यापीठ व्हावेत यासाठी जांबुवंतराव धोटे यांच्या नेतृत्वात मोठे आंदोलन झाले. अनेकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. अनेकांनी कारावास भोगला. शेवटी विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ झाले. या आंदोलनाला बाळासाहेबांनी पत्रकार संपादक म्हणून खूप मदत केली. कृषी विद्यापीठ होण्यासाठी लोकजागृती करण्यात त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. चिखलदाराची दीपशिखा सैनिक शाळा सुरू करण्यात त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. विदर्भातील ही पहिली सैनिक शाळा होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी केले व त्यासाठी कारावासही भोगला.

बाळासाहेब वीर वामनराव जोशी यांचे अनुयायी होते. त्यांचा पिंड आणि वक्तृत्व वीर वामनरावांसारखे होते. ते राष्ट्रवादी विचारांचे थोर प्रबोधनकार होते. राष्ट्रसेवेचे व समाजसेवेचे, समाजपरिवर्तनाचे साधन म्हणूनही त्यांनी पत्रकारितेचा स्वीकार केला व पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी देशसेवा व समाजसेवा केली. अमरावती जिल्ह्याच्या नव्हे मराठी पत्रकारितेत त्यांचे स्थान आणि मान मोठा आहे. त्याबाबत संकलन, संशोधन, अभ्यास संपादन होऊन ग्रंथरूपाने ते प्रकाशित होणे आवश्यक आहे. मराठी पत्रकारितेतील ते एक जाणते प्रज्ञावंत संपादक होते. वृत्तपत्राचे मालक, प्रकाशक होते. पत्रकारितेच्या क्षेत्रातून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य डोळे दिपवणारे अफाट कार्य आहे. त्याच्या विस्ताराने नोंदी झाल्या पाहिजेत. कार्य करण्यात बाळासाहेब कमी पडले नाहीत पण त्यांच्या कार्याची नोंद घेण्यात आम्ही कमी पडत आहोत. ते पत्रकारितेतील एक मोठे दीपस्तंभासारखे व्यक्तिमत्त्व होते. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून समाजसेवेसाठी व समाज

प्रबोधनासाठी त्यांनी पत्रकारितेचा वसा घेतला होता. वृत्तपत्र न वाचणाऱ्या जनसामान्यांमध्ये त्यांनी वृत्तपत्र वाचनाची आवड निर्माण केली व ज्यांच्या हाती लेखणी नव्हती अशा जाती-जमाती व समाजाला त्यांनी लिहिण्याची प्रेरणा देऊन लिहिते केले. बलसंवर्धन व श्रमनिष्ठेचा त्यांनी सदैव पुरस्कार केला. ते मानवतेचे पुजारी, दीन दलितांचे उद्धारक होते. स्वातंत्र्य चळवळीतील व समाज प्रबोधनाच्या चळवळीप्रमाणेच त्यांचे मराठी पत्रकारितेतील कार्य व स्थान अत्यंत मोठे, मोलाचे व महत्त्वाचे आहे. त्यांनी मराठी पत्रकारितेला नवीन मूल्ये, नवी दिशा, नवी दृष्टी स्वतःच्या आचरणातून दिली. त्यांचे कार्य चिरस्मरणीय, प्रेरणादायी असे आहे.

***(हिंदुस्थान दीपोत्सव २०२१ मधून साभार)***

---

## जिंदा दिल रहीये जनाब!!

चला जगूया, मस्त कलंदर,
नको उदासी, होऊ धुरंधर,
निघून जाते, वेळ दूरवर,
विसरुनी वय, होऊ खेळकर ।।१।।

जगलो जीवनी, आयुष्य आशेवर,
मोजूनी तारका, निरखून शशीधर ।।२।।

स्वार होऊनी, वर्षा सरींवर,
चिंब भिजूनी, हसूया खोलवर,
विटी, दांडू अन् खेळू लगोर,
सूर मारू, लटकू पारंबीवर ।।३।।

रास रसोनी, होऊ मुरलीधर,
गाऊनी गाणी, नाचू स्वरांवर ।।४।।

जीवन होऊदे, उत्सव मोदभर,
सजवू हास्य ते, सुंदर मनोहर,
किशोर वय, तारुण्य निरंतर,
वार्धक्यही, समजू या सुंदर ।।५।।

घटा पळतील, संपतील हळूवर,
तरीही असोदेत, हास्य चेहऱ्यावर ।।६।।

दुखऱ्या मनाचं, उघडूनी द्वार,
उंच नभांवर, होऊनी स्वार,
चिंता, समस्यांवर, करोनी वार,
जमवू मित्र, सवंगडी ही चार ।।७।।

थोर विचारी, सांगती त्रिवार,
तुझ्या जीवनाचा, तूच शिल्पकार
चलो सारे, बोलो, मिलकर,
उम्र की, ऐसी तैसी यार ।।८।।

**सुधाकर (बाळ) मराठे**
९८२२३ २९७७०
०५/०९/२१

## आई

आई असते म्हणून सारे निभावते
जग हे सारे तीच दाखवते
मान अपमान झेलून मुलांना मोठे करते
पंख फुटले पिल्लांना की जातात दूर निघून
मनात शंका तिच्या, पाहतील की नाही मागे वळून!
कधी कधी हसता हसता जेव्हा मन अचानक भरून येते
तेव्हा तिच्या कुशीत मनमोकळे रडता येते
ती बाजूला घेऊन समजावते
चारचौघात ती कधी अपमान नाही करत
ती सांगते ते बरोबर असते हे आपल्याला उशिराने कळते
काळा असला गोरा असला, ठेंगणा, उंच अथवा कुरुप
वाढवताना त्याला ती पाहते त्यात बाळकृष्णाचं रूप

**– श्रीमती मृदुला मराठे,** (पृ. २७७)
'कैलास' विष्णूनगर, नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

## सहवेदना



पुणे येथील कुलभगिनी सौ. ललिता रमेश मराठे, कळंबुशी घराणे यांचे दि. १६ ऑगस्ट २०२१ रोजी दुःखद निधन झाले. त्या अत्यंत सुविद्य, संस्कृत, प्राकृत विदुषी होत्या. संसार सांभाळून त्यांनी M.A. प्राकृत, M.A. संस्कृतमध्ये PhD तसेच इ. B.Llb. या पदवी प्राप्त केल्या होत्या. त्यांचा PhDचा प्रबंध अतिशय वाखाणला गेला होता. सध्या त्या गणपती मानवमुखी की हस्तीमुखी या विषयावर संशोधन करीत होत्या. हे संशोधन पूर्णत्वास येत असतानाच त्यांना देवाज्ञा झाली. मराठे परिवाराकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



## ।। श्री शिवरायांची आरती ।।

आरती शिवराया महाराजा वीरशौर्या।
सिंहासनी छत्रपती दिली स्वराज्याची छाया
आरती शिवराया ।।धृ।।

पुण्यशिल माता-पिता कुलस्वामिनी पावली
धन्य माया जिजाऊ ही राजमाता प्रसवली
घडविण्या इतिहास संत मूर्ती प्रगटली
अवतीर्ण धरेवरी येई रयतेसी ताराया ।।१।।

तलवार भवानी हाती करी स्वराज्य रक्षण
नसे जाती धर्म भेद चारी पुरुषार्थ जतन
राखीयली नारी लाज दिले देवालयी स्थान
साकारीली राजनीती युक्ती प्रयुक्ती लीलया ।।२।।

नीतीवंत कुलवंत योगी श्रीमंत थोर
तव शूरत्वाची गाथा सातासमुद्रापार
हरहर महादेव गर्जे मावळे वीर
लीन स्वर संगीताचे भावे स्वीकारी कार्या ।।३।।

**- संगीताताई व्यवहारे, पिंपळे**

# तुंग किल्ला

श्रेणी- मध्यम - तुंग वाडीतून गडावर जाण्यास एक तास लागतो. गडमाथा छोटा असल्यामुळे एक तासात सर्व गड पाहून होतात. गडावर जाणारी वाट मारुतीच्या मंदिराजवळून जाते. या मंदिराजवळ गावात पाणी आहे. या मंदिरापासून थोड्याच अंतरावर गडावर जाण्यासाठी पायऱ्या लागतात. पायऱ्यांच्या वाटेत एक हनुमान मंदिर लागते. पुढे गोमुखी रचनेचा दरवाजा आहे. येथून आत शिरल्यावर आपण गड माथ्यावर पोहोचतो. उजवीकडे गणेशाचे मंदिर आहे. मंदिराच्या मागील बाजूस पाण्याचा खंदक आहे. येथूनच बालेकिल्ल्यावर जाणारी वाट आहे. बालेकिल्ल्यावर तुंगी देवीचे मंदिर आहे. मंदिरा समोरच जमिनीत खोदलेली गुहा आहे. तुंग गड अर्ध्यातासात उतरतो. तुंग वाडीतून तिकोना पेठेत बसने जाण्यास साधारण सव्वा ते दीड तास लागतो.



# तिकोना किल्ला

श्रेणी – मध्यम, तिकोना वाडीतून गडावर जाण्यास एक तास लागतो. गडमाथा छोटा असल्यामुळे एक तासात सर्व गड पाहून होतात. गडाच्या दरवाजातून आत शिरल्यावर डावीकडे वळावे. थोडे अंतर चालून गेल्यावर एक पाण्याचे टाके आणि गुहा लागते. गुहेच्या बाजूने जाणाऱ्या वाटेने थेट बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी पोहचतो. प्रवेशद्वाराच्या पायऱ्या ह्या दमछाक करणाऱ्या आहेत. दरवाज्यातून आत शिरल्यावर उजवीकडे पाण्याचे टाक आहे. तर डावीकडे तटबंदीचा बुरूज दिसतो. सरळ थोडे वर गेल्यावर एक वाट उजवीकडे उतरते. येथे पाण्याची काही टाकी आहेत. येथून माघारी फिरून सरळ वाटेला लागावे. ही वाट आपल्याला काही तुटलेल्या पायऱ्यांपाशी मोठा खंदक आहे. याला वळसा घालून गेल्यावर आपण ध्वजस्तंभाच्या जागी पोहोचतो. बालेकिल्ल्यावरून समोरच तुंग, लोहगड, विसापूर, भातराशीचा डोंगर, मोर्सेचा डोंगर, जांभुळीचा डोंगर, पवनेचा परिसर आणि फागणे धरण दिसते. तिकोना गड अर्ध्या पाऊण तासात उतरतो. खाली तिकोना पेठेत चहा घेतला की घराकडे ...



# बल्लाळ गड


काजळी हे बल्लाळ गडाच्या पायथ्याचे गाव आहे. तेथे जाण्यासाठी मुंबई – अहमदनगर महामार्गावरील १३० किमी वरील तलासरी गाठावे. त्यापुढे अंदाजे १९ किमीवर (मुंबई पासून १४९ किमीवर) काजळी गाव आहे. पण या गावाचा बोर्ड महामार्गावर न लावल्यामुळे गाव आल्याचे कळत नाही. या गावाच्या बाहेर महामार्गालगत मुंबईकडून अहमदाबादला जाताना डाव्या बाजूला काजळी गावाला जाणारा फाटा आहे. या फाट्यावरून पुढे गेल्यावर गावातील शाळेपाशी पोहोचतो. या शाळेसमोरील टेकडीवर बल्लाळ गड आहे. गावातील शाळेजवळ समोर हातपंप आहे. त्याचे पाणी पिण्यायोग्य आहे. त्यातून पाणी भरून गड चढावा. कारण गडावर पाणी नाही आहे. काजळी गावाच्या मागे बल्लाळ गड आहे. गावाच्या शाळेसमोर एक गोरखचिंचेचे झाड आहे. त्याच्या उजव्या बाजूने एक कच्चा रस्ता टेकडीवर जातो. परंतु या रस्त्याने न जाता डाव्या बाजूच्या मळलेलया पायवाटेने १० मिनिटाचा खडा चढ चढून आपण गडावर पोहोचतो. पाहण्याची ठिकाणे : बल्लाळगडाच्या माथ्याच्या अलीकडे एका झाडाखाली एक वीरगळ ठेवलेली आहे. महाराष्ट्रात अनेक वीरगळ आहेत त्याहून ही वीरगळ वेगळी आहे. या वीरगळावर एक योद्धा घोड्यावर बसलेला दाखवलेला आहे. याचा घोडा काठेवाडी पद्धतीचा आहे. सुंदर सजवलेला आहे. त्या वीरगळावर




सूर्य चंद्र दाखवलेले आहेत. महाराष्ट्र गुजरातच्या सीमेवर असलेल्या या किल्ल्यावर वीरमरण आलेल्या वीराचा वीरगळ पाहण्यासाठी आहे. वीरगळ पाहून बल्लाळगडाच्या माथ्याकडे चालू लागावे. बल्लाळगडाचा माथा चार बुरुज व तटबंदीने संरक्षित केलेला आहे. त्यातील ४ बुरुजांचे आणि तटबंदीचे अवशेष आजही पाहायला मिळतात. तटबंदी १५ फूट उंच असून ५ फूट रुंद आहे. तटबंदी प्रचंड मोठे दगड वापरून ती बनवलेली आहे. तटबंदीमध्ये शौचकुप बनवलेले पाहायला मिळतात. तटबंदीच्या आत दोन मोठे हौद आहेत. त्यात दगड आणि पालापाचोळा पडल्याने ते भरून गेले आहेत. त्यांचे नकी प्रयोजन कळत नाही. कदाचित धान्य किंवा दारुगोळा यांच्या साठवणुकीसाठी याचा वापर झाला असावा. हौदाची साफसफाई झाल्यास त्यांचे नक्की प्रयोजन कळू शकते.

♦

## • साभार पोच •




**किरात दिवाळी २०२१**
**मुद्रक-प्रकाशक :** मेघःश्याम केशव मराठे, किरात ट्रस्ट वेंगुर्ले
**भ्रमणध्वनी :** ९४०२३६४७६४ / ९६८९९०२३६७
**संस्थापक :** कै. अ. बा. मराठे
**संपादिका :** सौ. सीमा शशांक मराठे
**पृष्ठसंख्या :** १८०
**मूल्य :** रु.१५०

**हिंदुस्थान दीपोत्सव २०२१**
**संपादक :** श्री. उल्हास मराठे
**अतिथी संपादक :** डॉ. निशिगंधा वाड
**प्रबंध संपादक :** श्री. विलास अरुण मराठे
**मूल्य :** ८० रुपये • **पृष्ठसंख्या :** २३४
**पत्ता :** मुख्य कार्यालय, रखापर्डे बगिचा, अमरावती
दूरध्वनी : ०७२१ - २६६०४२९/२६६६४६४